स. ग्र. सं. ठाणे
विषय भू. प्रवास
क्र. न. ३१८
१०६२



“ माउंट फ्युजियामा ”

# मी पाहिलेला जपान

REFBK-0012992

सौ. शैला पंडित

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३८२८५... दि: ...१२.११.९१...
क्रमांक ...३९८... नों. दि. ...२५।१।६३...
१२९९२
REFBK-0012992

# मीं पाहिलेला जपान

— लेखिका —

लीला जगन्नाथ पंडित, बी. ए.

मूल्य
दीड रुपया

ब्रह्मलिखित प्रकाशन पुणें २.

— प्रकाशक —

सौ. लता तांबे
वेस्टर्न इंडिया सदन
१९७३/४ टिळकरोड,
पुणें २.

★

सर्व
हक्क
लेखिकेच्या स्वाधीन

१९६२

★

— मुद्रक —

अ. वा. गोखले, बी.ए., बी.कॉम्.
उदय प्रिंटिंग प्रेस,
पुणें २.

अनुक्रम ........
नों: दि: ........

# मीं न पाहिलेल्या जपानसंबंधीं—

कुठलाहि चांगला विषय रुक्ष करण्याचें सामर्थ्य परीक्षा-पद्धतींत आहे, कीं तें शाळकरी वयाचें गमक आहे कुणास ठाऊक ! भूगोल हा माझा शाळेंतला किती नावडता विषय ! परंतु सौ. शैलाताई पंडित यांचा **“ मीं पाहिलेला जपान ”** वाचून पुन: लक्षांत आलें, कीं आत्मीयतेनें केलेल्या कुठल्याहि वर्णनांत ज्ञान व रंजन यांचा स्वाभाविकच संगम होतो.

मला हें पुस्तक आवडलें तें त्यांतील मनमोकळ्या मांडणीमुळें. आत्मप्रौढीचा अंशदेखील कोठें आढळला नाहीं. लहान मुलांच्या औत्सुक्यानें सौ. पंडित, विमान, रेल्वे आणि खाजगी वाहनांच्या खिडकीच्या कांचांतून सारख्या बाहेर पहात असतात. डोंगरदऱ्या, मेघराजी, समुद्राची जवळीक, यांपासून विविधवस्तु–भांडार, शिशुबनें, प्रशाला, प्रार्थनामंदिरें, घरांच्या मागल्या बागा येथपर्यंत सगळ्या गोष्टी त्यांनीं मोठ्या कुतूहलानें पाहिल्या आहेत. त्या म्यूझियम्समध्यें हिंडल्या, त्याचप्रमाणें कारखान्यांतूनहि भटकल्या. सगळ्या वर्णनांत कौतुकमिश्रित आनंदाची छटा आहे. वर्णनांत बहुविधता असूनदेखील भावशून्यता नाहीं.

बाकी, वडापिंपळाचें झाड असो, ना हींतर भारताची ‘ इंदिरा ’ हत्तीण असो, ‘ माहेर ’ ची आठवण झाली नाहीं तर ती भारतीय स्त्री कसली ? मुलांचे दांत किडके दिसले तर ते छपविण्याचा मानभावीपणा नाहीं, तरी देखील मुलें आणि फुलें छान दिसतात हें सांगण्याचें आर्जव आहे. तुलना आहे पण

कडवटपणाचा गंध देखील नाहीं. जपानी कारखान्यांतील शिस्तीचें वर्णन केल्यावर देखील आपल्या कामगारांना फुकटचा उपदेश करण्याचा मोह कटाक्षानें आवरला आहे. जपानच्या भौगोलिक, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक स्थितीची माहिती देणारी जपानच्या सफरीची गोष्ट मनोज्ञ झाली आहे, ती केवळ या आपुलकीच्या नजरेमुळें !

केवळ एका महिन्याचे अवधींत घडलेल्या सहवासामुळे श्री. व सौ. पंडित परत यायला निघाले, त्यावेळीं निरोप द्यायला जपानी मित्रमंडळींनीं मोठ्या संख्येनें यावें यांत नवल काय ? आपुलकीची भावना पेरावी त्या जोमानें फोफावते ज्या सौहार्दाची मन:पूत उधळण श्री. व सौ. पंडितांनीं जपानच्या निवासांत केली असेल, त्याचा हा एक स्वाभाविक परिणामच म्हटला पाहिजे ! वाचकांना पुस्तक वाचून संपवायचे वेळीं जशी एका छान देशाची माहिती होते तशीच एका दिलखुलास सुगृहिणीचीहि ओळख होते !

आमच्या शाळकरी आयुष्यांत अशीं पुस्तकें लाभतीं, तर देशांचे अक्षांश-रेखांश आणि वाऱ्यांच्या दिशा पाठ करण्यापेक्षां अधिक मित्रत्वानें आम्ही इतर देशांची ओळख करून घ्यायला धजावलों असतों. म्हणून जपानच्या सफरीची शिळोप्याच्या गप्पांच्या सहजतेनें सांगितलेली ही कहाणी लहान आणि थोरांना हौसेनें वाचता येईल असा मला विश्वास वाटतो.

— मनोहर आपटे

दि. १-१२-१९६२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# मीं पाहिलेला जपान

## पूर्व तयारी—

**फेब्रुवारी** महिन्यांतल्या एका शुभ संध्याकाळीं माझे पति जगन्नाथ पंडित मला म्हणाले कीं, " बहुतेक पुढील महिन्यांत कंपनीच्या कामासाठीं मला जपानला जावं लागणार आहे. तुलाही बरोबर न्यायची माझी इच्छा आहे. त्यादृष्टीनें तूं तयारीला लाग. " माझ्या दृष्टीनें ती बातमी खूप आनंदाची, महत्त्वाची तर होतीच, पण तितकीच जबाबदारीचीहि होती. इथल्या इथें मुंबई–पुणें प्रवास करायचा असला तरी कितीतरी गोष्टी पहायच्या असतात. मग आतां तर परदेशाला जायचं होतं ! काय असेल तें असो, पण सगळ्या गोष्टी चांगल्या व्हायच्या असल्या म्हणजे त्या अगदीं मनाप्रमाणें सुरळित जुळत जातात. जपानला जायचा विचार जगन्नाथांनीं बोलून दाखवल्यापासून व्हिसा, पासपोर्ट, परकी चलन, मेडिकल सर्टिफिकेटस् व विमानाचीं तिकीटें हें सर्व हातीं यायला बरेच प्रयत्न करावे लागले. एप्रिलच्या २० तारखेला दुपारीं चारच्या विमानानें आम्ही निघणार हें पक्कें ठरलें. बरोबर घ्यायचें निवडक कपडे, सुपारी, आंब्याची वडी व नित्य लागणाऱ्या जरूरीच्या वस्तू वगैरे जुळवून आमच्या दोघांच्या बॅगा भरल्या.

**माझ्या** गैरहजेरींत आमच्या घरांतील सर्व जबाबदारी माझी धाकटी जाऊ सौ. ज्योत्स्ना पंडित हिनें स्वेच्छेनें पत्करायचें कबूल केलें. त्याप्रमाणें ती आलीहि व तिनें ती जबाबदारी फारच सुंदर तऱ्हेनें पारहि पाडली. आम्हां उभयतांना प्रेमळ निरोप देण्यासाठीं माझे वडील ती. ऑफिशा (श्री. र. ल. कुमठेकर) पुण्याहून आले होते. त्यांनीं तर मला अक्षरशः फार मोठ्या काळजींतून मुक्त केलें. माझ्या चार मुलांपैकीं तीन मुलगे तसे मोठे व समजुतदार होते. आपल्या आईला आण्णांबरोबर (वडिल) जपानला जायला मिळतंय याचा त्यांनाहि आनंद वाटत होता. पण धाकटा पांच वर्षांचा अरुण मला सोडून कसा राहील, सर्वांना कितपत त्रास देईल, याची खूप काळजी वाटत होती. पण ती. ऑफिशा म्हणाले, "बाकीचीं मुलें त्यांच्या काकीजवळ नीट रहातीलच. पण अरुण फारच लहान आहे; त्याला मी माझ्याकडे पुण्याला नेतों, तूं त्याची जराही काळजी करूं नकोस." तो पुण्याला आईवडिलांच्या प्रेमळ सहवासांत जातोय या विचारानें मग मनावरची काळजी पुःकळच कमी झाली.

**अखेर** एप्रिलची वीस तारीख उजाडली. घरच्या मुलांच्या, पैशा-अडक्याच्या व इतर सुखसोयी मनपसंत लावल्या असताहि जाण्याचा क्षण जवळ येऊं लागला तसतशीं आमचीं दोघांचींहि मनें अक्षरशः भारावून जाऊं लागलीं. दुपारीं दोन वाजतां कुलस्वामिनीला व वडिलधाऱ्या माणसांना नमस्कार करून, मुलांना वारंवार जपून राह्यला सांगून आम्ही सर्वचजण विमानतळावर गेलों.

## सांताक्रूझ विमानतळ—

**अेअर** इंडिया इंटरनॅशनल कंपनीच्या टोकियोला जाणाऱ्या विमानांत आमच्या दोन जागा राखून ठेवल्या होत्या. विमानतळावर जाऊन पाहिलं तर आमच्या Investa Machine Tools and Eng. कंपनींतील बहुतेक मंडळी आम्हाला निरोप द्यायला तिथें हजर होतींच. मोठ्या प्रया-

सानें घट्ट केलेलें माझें मन तिथें गेल्यावर अक्षरश: भांबावून गेलें. तें हारगुच्छ देणें, ते फोटो, तीं निरोपाचीं बोलणीं, सर्वच असह्य होत होतं ! अरुण सर्व गोष्टी गंमत म्हणून उत्साहानें पहात होता. पण त्याच्याकडे पाहिलं कीं मला काय होत होतं याची कल्पना आपल्या लहान बाळापासून केव्हां ना केव्हां दूर जाणाऱ्या प्रत्येक मातृहृदयाला आल्याशिवाय रहाणार नाहीं. बरोबर ३॥ वाजतां कस्टम अधिकाऱ्यांसमोर तपासणीसाठीं हजर राहण्याचें बोलावणें आलें. सर्व मायेच्या माणसांतून पाऊलच उचलेना. डोळे तर चक्क पाझरूं लागले. तशाच शून्य मन:स्थितींत आम्ही दोघे कस्टम अधिकाऱ्यांपुढें जाऊन उभे राहिलों. आमचे पासपोर्ट, तिकिटें, मेडिकल सर्टिफिकेटस् तपासलीं गेलीं; आम्ही बरोबर घेतलेल्या सामानाची चिकित्सापूर्वक चौकशी झाली. मग आम्ही एका मोठ्या दालनांत येऊन बसलों. पांच सात मिनिटांतच सर्व प्रवाशांना विमानांत जाऊन बसण्याची सूचना लाऊडस्पीकरवरून घोषित केली. कुंपणाबाहेर उभ्या असलेल्या मंडळींकडे भरल्या डोळ्यांनीं डोळेभर पाहून घेतलें व मग आम्ही विमानाकडे निघालों.

**विमानांत** जाऊन आम्ही आमच्या जागेवर बसतों न बसतों तोंच समोर सूचना फलकावर दोन सूचना लाल अक्षरांत झळकल्या. पैकीं एक सूचना होती धूम्रपान बंदीची आणि दुसरी सूचना होती पट्टे बांधण्याची. खुर्चीलाच दोन्हीकडे दोन पट्टे असतात. हे पट्टे आपण कमरेभोंवतीं बांधायचे असतात. म्हणजे विमान वर चढत असतांना पडल्यासारखें वाटत नाहीं, किंवा घेरी येत नाहीं. म्हणून ते पट्टे इतर प्रवाशांप्रमाणें आम्हीहि बांधले. विमानांतील हवाई सुंदरी ( Air Hostess ) सर्वांना लवंग, सुपारी, आइस टॉवेल्स देत होत्या. प्रत्येक प्रवाशाची आस्थेवाइकपणें काळजी वहात होत्या.

## मुंबई सोडली—

**ठीक** चार वाजतां विमानाचे पंखे एकामागून एक सुरूं झाले. इंजिनांची धडधड जोरांत सुरूं झाली. विमान हळूहळू जमिनीवरच चालू

लागलें. पंख्यांचा वेग वाढत चालला. विमानहि जमिनीवरून धावूं लागलं, अन् त्यानें दिशा घेतांच क्षणार्धात तें जमिनीपासून वरवर जायला लागलं. एखाद्या हलक्या वस्तूप्रमाणें विमान एकिकडे हजारों फूट उंचीवर क्षणोक्षणीं चढतच होतं, अन् दुसरीकडे माझं मन मात्र जड होऊन विमानतळावर मागें सोडलेल्या मुलामाणसांजवळ अधिकाधिक घुटमळत होतं. एरवी प्रवासाला निघाल्यावर खिडकीजवळ जागा मिळवायची, धांवत्या गाडींतून बाहेरचीं पळणारीं दृश्यें पहाण्याची केवढी मला हौस ! विमानांत त्यादिवशीं मला जागा खिडकीपाशींच मिळाली होती. विमानांतून प्रवास करायची अपूर्व संधिहि प्रथमतःच मिळाल्यानं आकाशांतून धरणीवरचा दृष्टीस पड-णारा विहंगम देखावा पहाण्यासाठीं मी कितीतरी उत्सुक असायला हवं होतं. पण मन विषण्ण बनल्यानं बराच वेळ इतरत्र कुठें पहावसंच वाटेना मला !

खिडकीबाहेरचें दृश्य मीं प्रथम डोळे उघडून पहाण्याचा प्रयत्न केला तेव्हां संध्याकाळीं सहाचा सुमार होता. खालीं नजर टाकली तर सर्वत्र ढगच ढग दिसले. कापसाच्या राशीच्या राशी जणूं विखरून पडल्या होत्या, अन् त्या गर्दींतूनच वाट कापीत आमचें विमान पुढें चाललें होतें. सूर्यास्ताची वेळ असल्यानें मावळतीचीं तांबूस किरणें त्या ढगांच्या राशींवर पडून परावर्तित होत होतीं. त्या सुंदर मनोहारी चकचकीत गुलाबी दृश्यां-वरून नजर काढावीशीच वाटेना. पावणेसातच्या सुमाराला बाहेर चांगलंच अंधारल्यासारखं झालं. आमच्या विमानाचा लाल दिवाच तेवढा खिडकी-बाहेर चमकत होता. पण तितक्यांत आणखिन् लाल पिवळे ठिपके दूरदूर अंतरावरून मोठ्या वेगानें चमकत येतांना दिसले. कुतूहलानें पाहीपर्यंत मुंबईच्या रोखानें जाणारं तें दुसरं विमान बघतां बघतां आपल्या मार्गानं निघूनहि गेलं ! हजारो फूट उंचीवरहि क्षणभर कुणाची तरी सोबत झाली, हा विचार मनांत येऊन उगीचच धीर आल्यासारखं वाटलं !

## हिराकुडः—

बाहेर चांगलाच काळोख वाढल्यानें पहाण्यासारखें कांहीं असेल असें वाटेना. तेवढ्यांत विमानाचे एक पायलट आले व त्यानीं कार्ड आणून दिलं ! त्यावरून आमचें विमान एकोणीस हजार फूट उंचीवरून व ताशीं तीनशें पंचवीस मैलांच्या वेगानें जात आहेसें कळलें. खिडकींतून सहज खालीं पहाण्याचा प्रयत्न केला, तर काय दिसलं ? दिवाळींतल्या किल्ल्याचें आकर्षक दृश्य पहातें आहें असं वाटलं. हिराकुड धरणाचा त्या ठिकाणचा व्याप प्रत्यक्षांत केवढा तरी अफाट स्वरूपाचा आहे. पण विमानांतून अन् तेंहि रात्रीच्या काळोखांत, विजेच्या असंख्य दिव्यांमुळं दिसणारं तें दृश्य एखाद्या छोटया मॉडेलप्रमाणं मोठं मोहक दिसत होतं ! हें सर्व लिहायला अन् वाचायला जेवढा वेळ लागेल तितकाहि वेळ तें दृश्य पाहचला मिळालं नाहीं. विमानाच्या गतीमुळें जसं तें दृश्य दिसलं तसं क्षणार्धांत अचानक दिसेनासेंहि झालं !

## कलकत्याच्या विमानतळावर—

**सायंकाळीं** साडेसातनंतर आमचें विमान खालीं उतरूं लागलें. कलकत्त्याला विमान थांबल्यावर सर्व प्रवाशांना विमानतळावरील भव्य हॉटेलमधें जेवून येण्याची विनंती करण्यांत आली. इतर प्रवाशांबरोबर आम्ही दोघेहि हॉटेलमधें गेलों. कलकत्ता हें मायभूमींतलें अन्न सेवनाचें शेवटचें ठिकाण होतें. नंतरच्या प्रवासांत भारतीय पद्धतीचें जेवण मिळेलच ही खात्री नव्हती. आमटी, भात, भाजी, पोळीचें जेवण पोटभर जेवून सूचना मिळताच सर्व जण विमानांत जाऊन बसलों. पट्टा बांधून सुपारी खातोय तोंवर विमानानें कलकत्ता सोडलेंहि. रात्रीचें नऊ वाजून गेले होते. आतां मात्र भारताची हद्द सुटली होती. मातृभूमीचा वियोग मनाला त्रास देत होता. रात्रीं दहाच्या सुमारास जवळ जवळ सर्व प्रवासी गरम पेय घेऊन झोपू लागले. प्रवासांत मला झोप येतच नाहीं, हें ठाऊक असल्यानें जगन्नाथहि झोपी गेले. अंथरुणावर पडल्या पडल्या विमानापेक्षांहि वेगवान गतीनें माझं मन भटकायला लागलं !

बँकॉक—

**रात्रीं** एक वाजतां विमान बॅंकॉकच्या विमानतळावर उभं राहिलं. सर्व प्रवाशांना विमानांतून उतरून हॉटेलमधें जाऊन बसण्याची तालीम करावी लागली परदेशांतलें तें पहिलं स्थान असल्यानें तिथें सर्वांचे पासपोर्ट तपासले गेले. सर्व प्रवाशांना चहाकॉफी यातून काय हवं होतं तें मिळालं. आमच्या विमानांतील पायलट, होस्टेस व इतर अधिकारी इथें बदलले गेले. आम्ही पुन्हां विमानांत जाऊन बसलों तेव्हां आमचें स्वागत करायला बारीक डोळे व फुगीर गाल असणाऱ्या होस्टेस हजर होत्या. प्रत्येक ठिकाणीं विमानतळावर विमान थांबलें, कीं विमानांतील तेलपाण्याचा सांठा तपासला जातो. पेट्रोल भरलें जातें. त्याचप्रमाणें सर्व मशीनविषयक तपासण्याहि काळजीपूर्वक होतात. हीं कामें ठिकठिकाणचा नोकरवर्ग बिनबोभाट पार पाडीत असतो.

**विमानतळावर** तासभर थांबून आमचें विमान दोनचे सुमारास बॅंकॉक सोडून पुढे निघालें. सर्व प्रवासी पुन्हां निद्राधीन झाले. मी पूर्वीसार-खीच जागी होतें. तास दोनतास फार कंटाळवाणें गेले. नंतर हळूहळू आकाशात दिशा फटफटतांना दिसल्या. बाहेर डोकावून सभोंवार पहाण्याचा प्रयत्न केला तर सर्वत्र आकाशच दिसत होतें. गर्द निळ्या रंगाखेरीज दुसरं काहींच दिसेना. मी जागीच आहे असं पाहून एक होस्टेस तेवढ्यांत माझ्या-जवळ आली. म्हणून मी पण तिला विचारलं कीं, " हें सगळीकडे निळसर काय दिसतंय ?" तेव्हा तिनें सांगितलं कीं त्यावेळीं आमचें विमान चीनच्या समुद्रावरून सतरा हजार फूट उंचीवरून चाललें होतें. त्यामुळें सर्वत्र आभाळासारखा होणारा भास सुंदर दिसत होता.

**जसजशी** सकाळ होऊं लागली तसतशी डोंगर, टेकड्या, झाडें दिसूं लागलीं. तें पहात आहें तोंवर पट्टे बांधण्याची सूचना मिळालीच. विमान खालीं खाली उतरत होतें. उतरतांना विमान टेकड्यांच्या व शिख-राच्या फारच जवळून जात होतें. विमानाच्या पंख्याचा चुकून जरी शिख-

राला स्पर्श झाला तर ? हा भीतिप्रद विचार मनांत येईपर्यंत विमानाची चाकें 'रनवे'वर धावूहि लागलीं. विमान हाँगकाँगच्या विमानतळावर येऊन उभे राहिलें होतें.

### हाँगकाँग—

**हाँगकाँगला** उतरणारे बरेच प्रवासी होते. त्यांतील कांहीं दोनतीन दिवस हाँगकाँगमध्यें राहून मनसोक्त खरेदी करून मग टोकियोला जाणारे होते. हाँगकाँगला पुन्हां सर्वांचे पासपोर्ट तपासले गेले. इथें विमानतळावरील हॉटेलांत चहापाणीं, ब्रेकफास्ट छान मिळाला. तासाभरानें विमानानें हाँगकाँग सोडलें. टेकड्या–डोंगरानें वेढिलेल्या निसर्गरम्य परिसरांत हाँगकाँग शहर वसलंय्. वरती चढणाऱ्या विमानांतून हाँगकाँग शहराचा देखावा फारच सुंदर दिसत होता.

### टोकियो—

**हाँगकाँग** ते टोकियो अंतर विमानानें तोडायला सहा तास लागतात. मध्यंतरी कुठेंच उतरायचें नसतें. दुपारीं एकच्या सुमाराला विमानांतच दुपारचें जेवण आलें. गप्पा मारीत सावकाशीनें जेवण्यांत बराच वेळ गेला. नंतर मात्र खिडकीबाहेर काय दिसतंय तें पहावेसें वाटूं लागलें. बऱ्याचवेळां खालीं पांढरे स्वच्छ ढग पसरलेले दिसायचे. ढग विरळ असतील तेव्हां त्यांतून खालच्या प्रदेशाचें पुसट दर्शन होत असे. मधेच खालचा समुद्र, त्यातली एकादी बोट दिसत असे. चाराचे सुमाराला बेटांचा किनारा, किनाऱ्यालगतचे डोंगर, डोंगरावरील झाडी दिसूं लागली. साडेचार वाजायचे सुमारास विमान खूपच खालून जाऊं लागलं. जपानच्या भूमीवरूनच आम्ही जातोय हें लक्षात यायला वेळ लागला नाहीं. घरें, शेतें, कारखान्याच्या चिमण्या, इमारती स्पष्ट दिसत होत्या. त्यावरून आम्ही टोकिओ जवळ आलों असं वाटूं लागलं. पण तितक्यांत तो सर्व देखावा दिसेनासा झाला. विमान समुद्रावरून जात होतं. जिकडे पहावं तिकडे समुद्रच दिसत होता.

पहातां पहातां विमान समुद्राच्या जवळून जाऊं लागलं तेव्हां वाटलं कीं, खिडकींतून हात बाहेर काढला तर लाटांनीं तो नक्कीच ओला होईल ! तेवढ्यांत धूम्रपान बंदीची व पट्टे बांधण्याची ओळखीची सूचना मिळाली.

**समुद्राचे** पाण्यापासून वेगानें जातांजातां पुढच्याच क्षणी अगदी समुद्रकिनारीं सुरूं होणाऱ्या 'रनवे'वरून विमानानें धावायला सुरवात केली. टेकड्यांनीं वेढलेल्या हाँगकाँगच्या विमानतळावर विमान उतरवावयाचें कौशल्य वैमानिकाला गौरवास्पद वाटलें असेल यांत शंका नाहीं. वैमानिक सराइत असतात. पण नवख्या प्रवाशांचे धाबे मनांतल्या मनांत किती दणाणून जातें व त्यांच्या मनावर केवढा ताण पडतो हें मात्र माझ्याच उदाहरणावरून मला चांगलं समजून आलें.

**टोकियोच्या** जगप्रसिद्ध Heneda Int. Airport वर आम्ही उतरलों तेव्हां विमनतळावरचें घड्याळ संध्याकाळचे ४–५० झाल्याचें दाखवत होतें, तर माझ्या हातावरचें घड्याळ मुंबई टाईम प्रमाणें दुपारचा फक्त १॥ च वाजल्याचें दाखवत होतें. पांच वाजतां मीं माझें घड्याळ टोकियोंतल्या स्थानिक वेळेप्रमाणें लावून घेतलें. टोकियोचा विमानतळ फारच मोटा व कल्पक बांधणीचा आहे. बोटींतून प्रवास करून येणाऱ्याचें पहिलें पाऊल समुद्रकिनाऱ्यावर पडणें सहाजिकच असतें. पण इथला रनवे असा बांधला आहे कीं, जपानच्या भूमीवर थांबण्यापूर्वी विमानाची चाकें रनवेच्या जमिनीला स्पर्श करतात तींहि समुद्रकिनारींच. याचेंही कौतुकच वाटलें मला. विमानतळावरील ऑफिसमधें आम्ही जाऊन थांबलों, कारण प्रवास संपला होता. तेथील अधिकाऱ्यांनीं आमचे पासपोर्ट व आमची मेडिकल सर्टिफिकेटस्, व्हिसा, सामान, सर्व बारकाईनें तपासलें. आक्षेपार्ह अशी कोणतीहि वस्तू आमच्या सामानांत नसल्यानें आमची फार लवकर सुटका झाली. आम्ही कंपाउंडच्या बाहेर पडलों. उतरवून घ्यायला अपेक्षित मंडळी बाहेर होतीच. **ओकुमा मशिनरी वर्क्सचे** व्हाइस प्रेसिडेंट **श्री. ओकुमा** स्वत: जातीनें हजर होते. त्यांनीं आमची एकेकांशीं ओळख करून दिली. कमरेपर्यंत वांकून अभिवादन करण्याची पद्धत नवीन वाटली मला !

**टोकियोंत** आमची उतरण्याची सोय अँबेसेडर हॉटेलांत केली होती. हॉटेलमधें पाऊल टाकतांच तिथला ऐश्वर्यपूर्ण असा सरंजाम पाहून मी थक्कच झालें. तरीपण परदेशांतल्या मुक्कामांतली पहिली रात्र मी कधींच विसरणार नाहीं. आठ वाजतां आम्ही डायनिंग हॉलमध्यें गेलों. तिथल्या नोकरांना इंग्लिश समजत नव्हतं आणि आम्हाला जपानी येणं शक्य नव्हतं ! व्हेजिटेबल जेवण काय व कसें मागावायचें हा प्रश्नच होता. शाकाहारी सॅलडची डिश आली त्यांत १ टोमॅटो, कच्चा कोबीचा १ तुकडा, दोन बांबूचे कोंवळे तुकडे, काकडी, मुळा व अंडें येवढे प्रकार होते. मुकाट्यानें लोणी-पाव व काकडी खाल्ली नी उपाशी पोटीं खोलीवर परतलों. खोलीबाहेर तर वादळी वाऱ्यांनी नुसतें थैमान घातलें होतें, त्यामुळें कांहींएक सुचत नव्हतें. भरीला रिकाम्या पोटीं झोपही येत नव्हती. जगन्नाथ तर अगदीं निराश झाले होते. कारण त्यांना नेहमीचें जेवणहि चवदार, वेगवेगळ्या पदार्थांचें व रुचिपालटीचें लागतें. मांसाहार घेणें त्यांना शक्यच नव्हतें. शाकाहारी पदार्थ कोणते मिळतील याचा विचारच करवत नव्हता. एवढ्या त्या राज-शाही हॉटेलांत रिकाम्या पोटानें व अतिशय चिंताक्रांत मनानें ती सारी रात्र आम्ही कशी घालवली तें आमचें आम्हालाच माहीत !

**दुसऱ्या** दिवशीं मात्र जगन्नाथांना जाग येण्यापूर्वींच भरपूर विचार करून तिथल्या मुक्कामांत तीन्ही चारी वेळां जेवणासाठीं काय काय मागवायचें, त्यामुळें पोटभर आहार कसा मिळेल, याचा मी मनाशीं आराखडा ठरवून टाकला, व त्याप्रमाणें लगेच चहा, टोस्ट, लोणी, फळें, कॉर्नफ्लेक्स, दूध वगैरे पदार्थ चहाबरोबर खोलीत मागवले. जगन्नाथ जागे झाल्यावर त्यांनीं तोंड धुवून व पोटभर खाऊन जेव्हां चहा घेतला, तेव्हां मला जरा बरं वाटलं ! आदल्या रात्रीचें औदासीन्य आतां संपलें होतें. तदनंतर त्या दिवशीं सर्वांत प्रथम जर उत्साहानें कोणतें आवश्यक काम मीं केलें असेल तर तें बँकेत जाण्याचें. कारण भारतांतून येतांना आमच्यावरोबर जे चेक होते ते पौंड या चलनांत होते. त्याचें रूपांतर जपानी ' येन '

मधें होणें जरूरीचें होतें. एका पौंडाचें बदल्यांत एक हजार येन याप्रमाणें आम्ही थोडें पौंड बदलून घेतले आणि त्यानंतर एक डिपार्टमेंट स्टोअर पहाण्यास आम्ही गेलों.

**जपानमधील हीं स्टोअर्स** म्हणजे सर्वच परदेशी पाहुण्यांच्या कुतुहलाचा व कौतुकाचा विषय आहे. माझ्या माहितीप्रमाणें जपानसारखीं डिपार्टमेंट स्टोअर्स इतर फारच थोडया देशांमधें आहेत. हें स्टोअर म्हणजे पांच ते सात मजली असणारी व खूप मोठया लांबीरुंदीची संपूर्ण इमारत असते. या इमारतींत अगदी टांचणीपासून स्कूटर पर्यंत व पायमोज्यापासून टोपी पर्यंत जीवनाला आवश्यक अशा सर्व वस्तू वेगवेगळया विभागांतून विक्रीसाठीं ठेवलेल्या असतात. प्रत्येक वस्तूवर किंमतीची चिठ्ठी लावलेली असते. विक्रेत्या **जवळजवळ** सर्व स्त्रियाच असतात. प्रत्येक मजला चढून जाण्यासाठीं साधे जिने व लिफ्ट तर असतातच. शिवाय विजेचे जिने असतात. ठराविक पायऱ्या एका संथ वेगानें सारख्या वरवर जात असतात. आपण फक्त एका पायरीवर उभे राहयचें व ती पायरी अपेक्षित मजल्या-वर पोचली कीं उतरायचें. या पायरीवर प्रथम उभे रहातांना जितकी मजा वाटते तितकीच भीतीहि वाटते. सरावानें मात्र हेच जिने मग बरे वाटतात. मला तर प्रथमदर्शनी तें स्टोअर म्हणजे प्रदर्शनच वाटलं. आणि त्याचें तें सर्ववस्तूसंग्राहक स्वरूप पाहून तर मी चकितच झालें ! त्या दिव-शींची सकाळ बँक आणि डिपार्टमेंट स्टोअर यापायीं निघून गेली. नंतर खोलीवर जाऊन जेवण घेतले व थोडी विश्रांती घेतली.

## जपानी नृत्य—

**दुपारीं** अडीचच्या सुमाराला **श्री. ओकुमा** यांचा टेलिफोन आला. सर्वोत्तम जपानी नृत्य पाहयला जाण्याविषयीं फोन होता. ठरवायचं नव्हतंच कांहीं. लगेच तयारी केली व साडेतीनला त्यांच्या बरोबर आम्ही थिअेटरमधें गेलों. आंत जाऊन पाहिलं, तर थिअेटर अक्षरशः माणसांनीं फुललं होतं. जपानी लोकांची नृत्याविषयींची आवड त्यावरून दिसून येत होती.

**समोरच्या** स्टेजला व दोन्ही बाजूला असणाऱ्या ऑर्केस्ट्राच्या गॅलरीं-नाहि पडदे होते. जपानी भरतकामाचें अन् नक्षीकामाचें वैशिष्ट्य त्या तीन पडद्यांकडे पहातांच नजरेंत भरत होतं ! समोरचा मुख्य पडदा आकारानें खूप मोठा होता. रेशमाच्या वेगवेगळ्या धाग्यांनीं पडद्यावर पार्श्वभागीं नभोमंडल दाखवलं होतं. नभोमंडळांत ढग दाखवले होते. दोन डेरेदार झाडें कशिद्यानें फारच सुबक भरलीं होतीं. एक झाड पांढऱ्या फुलांनीं फुललेलें अन् दुसरें झाड लाल फुलांनीं फुललेलं दाखवलं होतं. थिएटरमधें गेल्या-नंतर थोड्या वेळानें तिन्ही पडदे वर गेले. दोन्ही बाजूला गॅलरींत असणाऱ्या मुली जपानी भाषेंत गाऊं लागल्या. प्रत्येकीच्या हातांत वेग-वेगळीं वाद्यें होतीं, व तीं वाद्यें त्या वाजवत होत्या. आश्चर्य असें कीं स्टेजवर काम करणाऱ्या मुख्य पात्रांचे प्रवेश प्रेक्षकांतून करण्याची अभिनव पद्धत त्या ठिकाणीं आढळली. त्यामुळें कलाकारांचे चेहरे, वेषभूषा सर्व कांहीं जवळून पाह्यला मिळालें. पहिल्या प्रवेशांत एक लोककथा दाखवली गेली. लोककथेचें सूत्र थोडक्यांत सांगायचें तर तें असं होतं—

**क्युबो** वानया नांवाचा तरुण देवळाचे ओवरींत बसून लाल रंगाचे चहाचे कप तयार करण्याचा धंदा करीत असतो. त्या धंद्यासाठीं गम्बे नांवाच्या सावकाराकडून तो कर्ज काढतो. ठरलेल्या मुदतींत कर्ज फिटण्याची शक्यता दिसेनाशी झाल्यावर आपणहि पतीला मदत करावी या हेतूनें मात्सुयामा— त्याची पत्नी— त्याला सोडून दूर निघून जाते. वियोगानें तो जवळजवळ वेडा होतो. पुढें मात्सुयामा परत येते तेव्हां तो तिच्यावर तीक्ष्ण हत्यारानें वार करतो. **पण** कियुमोन नांवाचा एक सज्जन तिला वांचवतो. अन् पुढें पति-पत्नि सुखानें राहूं लागतात !

**हा प्रवेश** जवळजवळ अर्धा तास चालला होता. त्यांतील संवाद अन् अभिनय तीं तीं पात्रें करून दाखवत होतीं. गाण्याचें काम मात्र गॅलरीं-तल्या स्त्रिया करीत होत्या.

**दुसऱ्या** प्रवेशांत फुलें, बर्फ, चंद्रबिंब यांचें वैशिष्ट्य दर्शविणारें


अनुक्रम 38249 ... प्रकार
376 ... नों. दि. 24/7/63

नृत्य झालें. स्टेजवर प्लायवूडच्या सहाय्यानें डोंगर उभे केले होते. पार्श्व-भागीं पडद्यावरहि बर्फाच्छादित डोंगर चितारले होते. एक नर्तिका हातांत उघडलेली छत्री घेऊन तालावर पावलें टाकत प्रेक्षकांतून स्टेजवर गेली. तिच्या अंगावर वरून बर्फाचा शिडकाव होऊं लागला. तशा आशयाचें गीत साथीसह गॅलरींतल्या स्त्रिया गाऊं लागल्या. नर्तिका नाचत नाचत बाजूला सरकली. तेवढ्यांत स्टेज दुभंगल्याचा भास होऊन, काळसर वस्त्रें घातलेली नर्तिका हातांत आरशासारखीं वस्तू घेऊन आंतून स्टेजवर आली. हावभाव अन् नृत्य यांच्या मदतीनें चंद्राचें महात्म्य ती सांगू लागली. तेवढ्यांत तिसऱ्या नर्तिकेनें अचानक येऊन प्रेक्षकांना चकित केलें. तिचा सर्व वेष, कपडे वगैरे, गुलाबी रंगाचा असतो. तिनें केंसांत गुलाबीं फुलें ग्वोंवलेलीं असतात, आणि साकुरा फुलांची एक छोटीशी फांदी तिनें हातांत घेतलेली असते. तिचें नृत्य संपल्यावर तिघीजणी हातांत पंखे घेऊन एक सामुदायिक नृत्य करतात अन् मग कार्यक्रम संपतो.

**डोळ्यांनीं** समोर नृत्य पहातांना कान आर्केस्ट्रा व जपानी गीत ऐकत होते, पण मनाला चुकल्यासारखें वाटत होतें. कारण नृत्य म्हणजे घुंगरू पायांत असायला हवेत व त्यांचा छुमछुमाट कानांत घुमायला हवा. पण नेमकें तेवढेंच यांत नव्हतें, म्हणून चुकल्यासारखें वाटलें. नृत्याचा कार्यक्रम संपल्यानंतर हॉटेलमध्यें जाऊन चहा घेतला. रात्रीं जेवणाला कायकाय मागवावें या विचारांत मी होतें. तेवढ्यांत पुन्हां श्री. ओकुमांचा टेलिफोन आला. आम्हा दोघांना जपानी पद्धतीचें जेवण घेण्यासाठीं त्यांनीं बोलावलें होतें. संध्याकाळीं साडेसातच्या सुमाराला ते स्वतः आम्हाला घेऊन जाण्यासाठींच आले.

## जपानी पद्धतीचें जेवण—


**जपानचें** चहापाण्याचें, खाण्यापिण्याचें आणि भोजन समारंभाचें सारें तंत्र कांहीं प्रमाणांत आपल्याला अपरिचित असेंच आहे. पाश्चिमात्य



नॅचरल गार्डन आटामी (पान १८)



श्री. जगन्नाथ, लेखिका व श्री. कबुटो (पान २३)



ओकुमा मशीनरी वर्क्समधें संस्थापकांच्या स्मारकांसन्निध (पान २५)



"ओकुमा मशीनरी वर्क्समधें कार्य मग्न" (पान २५)

पद्धतीच्या हॉटेलमधें जेवणाचे हॉलमधें पायांत पादत्राणें असतांना जेवणाची पद्धत ! पण जपानी हॉटेलमधें दाराशीं पोंचताच प्रथम एक दोन स्त्रीनोकर पुढें येतात. कमरेपासून वांकून आधीं नमस्कार होतो स्वागताचा ! आणि लगेच खालीं वसून त्या आपल्या बुटाची लेस सोडू लागतात. पादत्राणें उतरवलीं जातात. मोजे पायांतच राहूं देत म्हणून सुचवलं जातं. अन् जवळच्याच शेल्फांतील वेताच्या किंवा मखमलीच्या सपाता आपल्या पायाशीं ठेवल्या जातात. म्हणजे आपल्याला अनवाणी तर चालावं लागत नाहीं पण बाहेरची धूळहि जेवणाच्या स्थळापर्यंत पोंचत नाहीं. कांहीं ठिकाणीं या सपाता गवताच्याहि असतात.

**जेवणाच्या** दालनांत गेलों. तेथें सर्वत्र चटया अंथरलेल्या होत्या. साधारण चौरंगाच्या उंचीचें पण लांबी रुंदीनें खूपच मोठें असें लांकडाचें बैठें टेबल होतें. त्या टेबलाभोंवतीं बसण्यासाठी कापूस भरून तयार केलेल्या उशीच्या आकाराच्या छोटया छोटया बैठका होत्या. आम्ही आमच्या जागी बसलों तेवढयांत जेवण वाढणाऱ्या तिथल्या स्त्रिया आमच्या पुढें आळीपाळीनें आल्या. प्रत्येकीनें जमिनीवर गुडघे टेकून जमिनीपर्यंत वाकवांकून पुन्हा आम्हाला अभिवादन केलें. मग वेताच्या टोपलीतून वाफा निघत असलेली गरम पाण्यानें ओली केलेली टॉवेलची एक एक घडी प्रत्येकाला दिली. त्याचें काय करायचें म्हणून डोक्यांत प्रश्नचिन्ह उभें होतें. पण समोर पाहिलें तर श्री. ओकुमा ती घडी उलगडून स्वतःचा चेहेरा व हात पुसत होते. मग अनुकरणाला मुळींच वेळ लागला नाहीं.

**जेवणाला** सुरवात झाली ती जपानी चहा व केकच्या छोटयाश्या तुकडयानें ! त्यानंतर दुसऱ्या फेरीला कांचेच्या एका वाडग्यांतून उकडलेले घेवडयाचे दाणे व त्याला लावण्यासाठीं मीठहि होतें. मात्र खाण्यासाठी काटा-चमचा नव्हता. जपानी लोक बाबूच्या दोन काडया उजव्या हातांत धरून, चिमटयानें पदार्थ उचलून खावा तसे खातात. काडयांनीं जेवणें साधेल कीं नाही असें वाटत होतें, पण थोडासा प्रयत्न केल्यावर काडयांनीं

जेवणें साधायला लागलें. तो पदार्थ खाऊन झाल्यावर रिकामीं भाडीं उचललीं गेली पुन्हां वशा व वाडगे माडले गेले. त्यांतून कांदा, टोमॅटो, काकडी, मुळा, कोवळा बांबू, केळी अन् समुद्रांतील वनस्पती हे सर्व पदार्थ कच्चेच पण फार कलात्मकरीत्या कापून वाढण्यांत आले. त्याबरोबर चवीसाठीं 'आजी नो मोतो' नांवाचा किंचित खारट पदार्थ वाढण्यांत आला. या पदार्थाचें स्वरूप असतें टेबल सॉल्ट सारखेंच. त्यानंतरच्या फेरीला मात्र मोठ्या बशींत भज्यासारखा पदार्थ व तो बुडवून खाण्यासाठीं वाटींत पातळ चटणी आली. या पदार्थाला टेंपोरा म्हणतात. आपल्याकडच्या मिक्स्ड भज्याच्या प्लेटसारखें टेंपोराचें रूप दिसतें.

**आपल्याकडे** कांदा-बटाटयाचीं गरम भजीं खाण्यासाठीं विश्रांतिगृहांत लोक जितक्या आवडीनें जातात तद्वत् टेंपोरा हा खाद्यपदार्थ जपानी स्त्रीपुरुषांना फार प्रिय आहे. कोणत्याहि फळभाजीचे काप करून, तांदूळाचे पिठांतून बुडवून काढून, वनस्पति तेलांतून ते चुरचुरीत तळून काढायचे. या प्रमाणें कांहीं मासेहि या प्रकारें तळून काढले जातात. पण खास आमच्यासाठीं त्यादिवशीचें जेवण असल्यानें तसलं कांहीं समोरहि आलं नाहीं. सर्वात शेवटी साधा भात व काकडीचें लोणचें आलें. त्यांच्याकडचा भात फार चिकट असतो. त्यानंतर आइस्क्रीम व सर्वात शेवटीं कॉफी किंवा जपानी चहा आणि जेवण झाल्यावर हाततोंड पुसण्यासाठीं पुन्हां प्रत्येकाला गरम टॉवेलची घडी देण्यांत येते.

**चहावरून** केव्हांतरी सांगायचें तें आत्तांच ओघानें आलंय् म्हणून सांगून टाकतें. जपानमध्यें चहाचे प्रकार वेगवेगळे अन् घेण्याच्या रीतीहि वेगवेगळ्या सापडतात. आपल्याकडे दुकानें, हॉटेल्स वा घरींदारीं आपण जो सर्रास चहा घेतो तसा त्यांच्याकडचा सर्रास घेण्याचा तयार चहा रंगानें हिरवा दिसतो. त्यांत साखर नसते अन् दूधहि नसतें. दुसऱ्या प्रकारच्या चहांत चहाचीं पानं जरा शेकून वाळवून वापरतात. त्यामुळें या चहाच्या पाण्याला तांबूस रंग येतो. या तांबूस चहांत दूध नसतेंच. पण थोडी साखर

व कागदी लिंबाची पातळ फोड त्यांत ढवळून तो चहा पितात. याशिवाय Tea Ceremony चें स्तोम जपानमधें फार असतें. हा चहा समारंभानें देवळाचे अंगणांत, टी हॉलमधें, थिअेटर वा नृत्यगृहाच्या विश्रांतिगृहांतून किंवा प्रसंगानें घरीहि होतो. विविध प्रकारचे टी सेटस् तिथें विकत मिळतात. हें चहाचें पाणी रंगानें हिरवेंच असतें. पण चहा थोडा दाटहि होतो. या चहाच्या कपाबरोबर जपानी केकचा तुकडा प्रत्येकाला दिला जातो. असो. रात्रीच्या जपानी पद्धतीच्या जेवणानंतर खोलीवर परतलों.

**दुसऱ्या** दिवशीं सकाळीं सर्व सामानासह टोकियो स्टेशनवर दहा वाजता गेलों. कारण टोकियोंतला मुक्काम तात्पुरता तरी संपला होता. टोकियो स्टेशनची इमारत फारच अवाढव्य आहे. स्टेशनवर विजेच्या इंडिकेटरवर गाड्यांची जाण्याची वेळ, प्लॅटफॉर्म नंबर, येण्याची वेळ दाखवली जात होती. शिवाय महत्त्वाची माहिती लाऊडस्पीकरवरूनहि सांगितली जात होती. आमची अपेक्षित गाडी साडेदहाला आली. आम्ही आंत जाऊन बसतों न बसतों तोंच गाडीनें स्टेशन सोडलेंहि !

**जपानमधल्या** आगगाड्या मला अतिशय सोयीस्कर, आरामशीर व प्रेक्षणीय वाटल्या. गाडीचे सर्व डबे परस्परांतून मार्ग ठेवून जोडलेले असतात. गाडी चालू असतांनाहि शेवटपर्यंत जातां येतां येतें. प्रत्येक डब्यात साठ ते ऐंशी माणसें बसू शकतात. मधें वाट ठेवून दोन्ही बाजूस दोन दोन खुर्च्या असतात. खूर्चीवरील बसण्याची व पाठ टेकण्याची बाजू मखमली कापडानें आच्छादलेली असते. आणि ह्या मखमलीची शोभा प्रवाशांमुळें कमी होऊं नये म्हणून डोकें टेकलें जातें तिथें व हात ठेवले जातात तिथें पांढऱ्या कापडाचे अभ्रे घातलेले असतात. डब्यांत कोणतीहि घाण सांपडत नाहीं. खाद्यपेयें, कागद, फळांच्या साली किंवा बिया या शक्यतों कुणी खालीं टाकतच नाहींत. पण त्यांतून डब्यांत घाण पडलेली आढळली, किंवा केरकचरा दिसला तर लगेच रेल्वेच्या स्त्रीनोकर येऊन कचरा गोळा करून ओल्या फडक्यानें जागा स्वच्छ पुसून जातात! प्रत्येक खुर्चीला अॅश् ट्रे बसवलेला

असतो. गाडीच्या खिडक्या खालीवर उचलल्या जातील अशी काचेची तावदानें आपल्यासारखीच असतात. शिवाय डब्यात येणारा प्रकाश कमीजास्त करतां यावा म्हणून प्लास्टिकचे मंद रंगाचे पडदेहि असतात. एरवी ते गुंडाळलेले असतात व प्रवाशाना त्यांचा उपयोग स्वतःचे मर्जीप्रमाणें करतां येतो. प्रत्येक डब्यांत लाउडस्पीकर असतो. त्यामुळें गाडी कोणतें स्टेशन घेणार, तिथें ती किती वाजतां पोचणार, किती वेळ थांबणार वगैरे सूचना त्यावरून सारख्या दिल्या जातात. आणखिन एक गोष्ट सांगा-विशी वाटते ती अशी कीं जपानांतील बहुतेक सर्व प्रवासी गाडीतील स्वच्छता व सुखसोयी यांची जपणूक करणारे असतात. त्याचप्रमाणें त्यांच्या-जवळ असणारं सामानहि अतिशय आटोपशीर व इतरांची जराहि गैरसोय न व्हावी असें असतें. ऑर्डिनरी ट्रेन, एक्सप्रेस व सुपर एक्सप्रेस असे गाड्यांचे तीन ठळक प्रकार त्या ठिकाणीं असल्याचें दिसून आलें.

**आमच्या** गाडीनें १०॥ वाजतां टोकियो सोडलें होतें. दोहों बाजूच्या खिडक्यांतून मी कुतुहलानें बाहेर पहात होतें. छोट्या–मोठ्या इमारतींची एकच गर्दी दिसत होती. पैकीं कांहीं मोठ्या इमारती दगडविटा, सिमेंटच्या बांधलेल्या होत्या तर काही लांकडी होत्या. रेल्वेमार्गाचे कडेनें इतर वाह-नांच्या रहदारीच्या मार्गाचें क्रॉसिंग जिथें जिथें आढळलें तिथें फाटक असें आढळत नाही, त्याऐवजीं तेवढ्या जागेवरून जेव्हां गाडी जातयेत असेल, तेव्हां फक्त साधा बांबू आडवा पाडून मार्ग आडवला जातो. रेल्वे क्रॉसिंगच्या अशा जागेजवळून गाडी जात असतांना झांजा वाजवाव्यात असा आवाज कानीं पडतो.

**धांवत्या** गाडींतून बाहेरची विविध दृश्यें व दूरवरचे देखावे पहाण्यांत वेळ फार लौकर संपत होता. कारखान्यांच्या इमारतींची आणि कारखानेदर्शक चिमण्याधुराड्यांची संख्या सर्वत्र उठावदारपणें दिसून येत होती. गवताची हिरवळ असणारीं क्रीडांगणें व उद्यानें, मधूनच दिसत होती. हिरवळीवर मुलें चेंडू बॅटचे खेळ खेळत होतीं, तर उद्यानातून झोपाळे, सीसॉ,

रैतीचे आखाडे या ठिकाणीं मुलांची गर्दी दिसत होती. लांबून तरी तिथलीं मुलें सुदृढ, हंसतमुख व खेळकर दिसत होतीं.

**स्टेशनावर** हमाल व कंडक्टर यांचीं कामें पुरुष करत होते. झाडलोट, स्वच्छता, प्लॅटफॉर्मवर अथवा चालत्या गाडींतून फेरीवाल्यांचीं कामें स्त्रिया करत होत्या. फळें, चॉकलेट, आईसक्रीम, थंडपेयें व दारूचे विविध प्रकार प्रवासांत सर्वत्र अधिक खपत असल्याचें दिसून आलें. लोकल-गाड्या तिथेंहि आहेत. पण त्या अतिशय छोट्या असतात. तीन वा चारच डब्यांच्या गाड्या वेगानें धांवत असतात.

**त्यावेळच्या** प्रवासांत बाहेर आणखिन जर कांहीं वेगळें दिसत असेल तर तीं गुलाबी रंगाच्या फुलांनीं डंवरलेलीं झाडें होत. जपानमधें साधारणपणें फेब्रुवारी–मार्च–एप्रिलच्या सुमाराला साकुराच्या झाडांना गुलाबी फुलांचा बहर येतो. आपल्याकडे त्यामुमाराला सर्वत्र गुलमोहोर फुलतो. जिकडे पहावें तिकडे झाडांवर पानें कमी व फुलें जास्ती अशी स्थिति असते. तिकडेहि हीं साकुराचीं झाडें गुलाबी अन् पांढऱ्या फुलांनीं इतकी फुलतात की वर्षभर पानानीं हिरवेगार असणारें झाड, पण त्यावर एकहि पान दिसत नाहीं. ऐन मोसमातलं सौंदर्य जरी आम्ही पाहूं शकलों नव्हतों, तरी वसंताचा सरता बहरहि ऐन मोसमाची संपूर्ण कल्पना देण्यास समर्थ होता !

## रेल्वेमार्गावरलि धांवतीं दृश्यें—

**अकराच्या** सुमाराला गाडीनें **याकोहामा** स्टेशन सोडलं. याकोहामाच्या पुढचा सर्व प्रवास अतिशय नयनरम्य वातावरणांतून झाला. मुंबई–पुणें मार्गावर पावसाळ्यांतील घाटांतलें दृश्य, झाडी, धबधबे, बोगदे आपल्या संवयीचे असले, तरी पुन्हां पहातांना आनंद होतोच ! त्याची आठवण या प्रवासांत झाली. पुढच्या प्रवासांत बरेच बोगदे ओलांडावे लागतात. गाडीच्या एका बाजूला उंचउंच डोंगर दिसतो, तर दुसऱ्या बाजूला समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर जोरानें आदळत असतात. खिडकीबाहेरच्या वातावरणांत

बोगद्यांचा वारंवार आडोसा आल्यानें सागराशीं आपला जणूं कांहीं लपंडावच चालूं असतो ! डोंगरपठारावर मोहोरीचीं पिवळीं जर्द शेतें गालिचाप्रमाणे शोभत होतीं. कैक ठिकाणीं शेतांतून शेतकऱ्यांची आकर्षक टुमदार घरें मन वेधून घेत होतीं. घरें, त्याभोंवतीं रंगीबेरंगी फुलांची बाग, बागेभोंवतीं बांबूचें कुंपण पाहयला फार सुंदर दिसत होतं.

**कांहीं** शेतांतून पिकावर कापडाच्या लांबचलांब कमानी उभारलेल्या दिसल्या. बारकाईनें पाह्यल्यावर लक्षांत आलं कीं, कोंवळ्या रोपांचं ऊन, वारा व पाऊस यांपासून रक्षण व्हावं म्हणून प्लास्टिकचीं आवरणें मोठ्या खुबीनें रोपांवर बांबूच्या काड्यांच्या कमानी खोंचून, त्यावर प्लॅस्टिक पसरून केलीं होतीं. **कोझू** (Kozu) नांवाच्या स्टेशनच्या आसपास संत्र्यांच्या खूप बागा दिसत होत्या. संत्र्यांचीं हिरवीगार झाडें नारिंगी रंगाच्या फळांनी अक्षरश: लवलीं होतीं. कोझूनंतर **ओडावारा** जंक्शनवर गाडी थांबते. इथून Hakone नांवाच्या निसर्गरम्य स्थळाकडे नेणारा गाडीचा मार्ग लागतो. ओडावारा पासून आढळलेले बोगदे लांबीला जास्ती होते. दुपारीं बाराचे सुमारास गाडी **आतामी** स्टेशनवर जाऊन थांबली.

**आतामी—**

**स्टेशन** जसें जवळ येत होतें तसें गाडीच्या डब्यांत असलेल्या लाऊडस्पीकरवरून (Atami) स्टेशन आल्याचें जाहीर करण्यांत आलें. स्टेशनवर उतरल्यावर टॅक्सी केली व सामानासह आतामी हॉटेलमधें पोंचलों. या हॉटेलची बांधणी पाश्चिमात्य पद्धतीची आहे. प्रवेशद्वाराभोंवतीं टेकड्यांचें कुंपण आहे. आंत शिरतांच दोन्ही बाजूला प्रवाशांच्या खोल्या आहेत. दरवाजासमोर एक खूप मोठा हॉल आहे. त्यांत टेलिव्हिजन सेट बसवल्यानें बरेच प्रवासी करमणुकीसाठीं तिथें वेळ घालवूं शकतात. हॉटेलच्या मागच्या अंगणांत विविध फुलझाडांची गर्दी, व अंगणाच्या कडेला समुद्र पसरलेला दिसतो.

**समुद्र किनारीं** निळसर दगडांनीं बांधून काढलेला, व अद्यावत् सुखसोयींनीं युक्त असा पोहण्याचा तलावहि होता. तिथला मुक्काम दीड दिवसाचाच होता. दुपारच्या जेवणास **श्री. ओकुमा** बरोबर होतेच. जेवण झाल्यावर आम्ही **श्री. ओकुमा** उतरले होते तें जपानी हॉटेल पाह्यला गेलों. ती स्त्री नोकरांचीं अभिवादनें, हात पुसायला गरम टॉविल, केक व हिरवा चहा या सर्व कार्यक्रमांत आम्ही आतां सराईत बनलों होतों. जपानीपद्धतीच्या हॉटेलमधें प्रवाशाला दोनतीन खोल्यांच्या ब्लॉकसारखी जागा वापरायला मिळते. आतामी Hot Spring साठीं प्रसिद्ध आहे. नैसर्गिक गरम पाण्याच्या झऱ्यांचें पाणी बाथरूममधें नळानें आणवलें होतें. हॉटेलमधल्या बागेत कृत्रिम तलाव, त्यावरील सुंदर लांकडी पूल, नानातऱ्हेचीं फुलझाडें व हवेंतला गारवा मनाला प्रसन्न करून सोडत होता. आतामीला नवविवाहितांची व विश्रांतीला येणाऱ्यांची एकच गर्दी असते. आतामी शहर डोंगराच्या उतरणीवर वसलं आहे. पायथ्याला समुद्राच्या लाटा धडका देतात. निसर्गरम्य वातावरणानें आतामीच्या सौंदर्यांत भर पडली आहे.

**ओसाकाकडे—**

**आतामीला** दीड दिवस थांबून सकाळीं नवाच्या सुमाराला आम्ही आतामी स्टेशनवर आलों. तिथून ऑर्डिनरी एक्सप्रेसनें निघालों. आकाश थोडेंसें अभ्राच्छादित होतें. या प्रवासांत लांबच लांब बोगद्यांतून जावें लागत होतें. हाकोने पर्वतांतला रेल्वेमार्ग जास्त लांबीच्या बोगद्यांतून आहे. बोगद्यांत शिरण्यापूर्वींचें ढगाळलेलें वातावरण घेऊन गाडी बोगद्यांत शिरली होती. पण बाहेर आल्यावर पाहिलें तर सर्वत्र चक्क ऊन पडलेलें! ढगांचा मागमूसहि नव्हता. पुढें **नुमाझु** स्टेशनवर आम्ही उतरलों. नंतरचा प्रवास एक्सप्रेसनें व्हायचा होता. गाडी यायला अवकाश असल्यानें नुमाझु स्टेशनवरील हालचाली पाह्यला सापडल्या. स्टेशन प्रवाशांनीं फुललं होतं. शाळेचें विद्यार्थी सहलीच्या तयारीनें गाडीची वाट पहात मोठ्या संख्येनें उभे होते. खाण्यापिण्यांत, गप्पाविनोदांत, गाणीं गुणगुणण्यांत, फोटो काढण्यांत त्यांचा

उत्साह उतू चालला होता प्लॅटफॉर्मवर ताज्या दुधाच्या बाटल्या, चहाच्या छोटया किटल्या कपाऐवजीं मिळतात. किटलीच्या गळयांत तार अडकवून त्याची कडी केलेली असते. किटलीवर कपासारखें झाकण असतें. प्रवासी चहा पितात व किटली वांकाखालीं ठेवून देतात. त्या किटल्या धुवून पुसून पुन्हां वापरतात की फेकून देतात तें मात्र कळलें नाहीं. आपल्याकडे कांहीं स्टेशन-वर मातीच्या ग्लासांत चहादूध मिळतें. पेय प्यायल्यावर ग्लास खापराचा म्हणून फेकून द्यायचा. त्याची मला तिथें आठवण झाली. थोडयाच वेळांत सुपर अेक्सप्रेस आली व आमचा पुढील प्रवास सुरू झाला.

## ओसाकाकडे—

नुमाझु ते नागो याच्या दरम्यान पंचवीस-तीस स्टेशनें गाडीनें मागें टाकलीं. पुष्कळशा स्टेशनांवर गाडी थांबलीच नाहीं. नागोया स्टेशन-वर श्री. ओकुमा उतरले. पुढच्या ओसाकापर्यंतच्या प्रवासांत दिसलेलीं आजूबाजूचीं दृश्यें विलोभनीय व विविध प्रकारचीं होतीं. तिथल्या लोकांचें वैशिष्टय त्यांतील कांहींत उठावदारपणें दिसून येत होतं ! मानवनिर्मित स्थळांचें रमणीय रूप पहात असतांना मधून मधून नैसर्गिक सुंदर दृश्यें दृष्टीस पडावींत तर कित्येक ठिकाणीं निसर्गाची बेमालूम मदत पदरीं पाडून घेऊन मानवी सुखसोयी मोठ्या दिमाखानं स्थानापन्न झालेल्या दिसत होत्या. त्या सर्वांची नोंद देणें जरी फार सविस्तर ठरणार असलें, किंवा अशक्य असलें, तरी नमुन्यादाखल म्हणून थोडाफार सांगतें.

पहिलीं दोन स्टेशनें सोडल्यावर खूप मोठ्या खाडीवरील पूल गाडीनें ओलांडला. त्यानंतर थोड्या वेळानें अति उंच डोंगरमाथ्यावरून मोठमोठे पाण्याचे पाईप पायथ्याकडे नेलेले दिसले. आतां आमच्या भारतांतहि वीजनिर्माण केंद्रें खूप होत आहेत. पण त्यांच्याकडे खेडोपाडीं वीज जाऊन पोंचली आहे. कांहीं डोंगरावरून चहाची लागवडहि नजरेस पडते. गवताची टोपी डोक्यावर घालून चहाच्या मळयांतून कामें करत खूप स्त्रिया वावर-तांना दिसत होत्या. त्यांच्या झोपडया, कोंबडया, कबुतरें, खुराडीं, बांबू-

वर धुवून वाळत टाकलेले व वाऱ्यानें फडफडणारे कपडे, चहाच्या मळ्या-नजीक असणारी टुमदार लांकडी बंगल्यांची वस्ती, घराभोंवतीं फुलझाडांच्या अति शोभिवंत बागा, त्या बागांच्या कुंपणावर उन्हांत वाळत टाकलेल्या रंगीत दुलया, गरम कपडे, एक ना अनेक गोष्टी धावत्या गाडींतून डोळ्यांत चटकन् भरत होत्या. शेती, मळे व वस्ती यांच्या बरोबरीनें मधूनमधून नुसतीच दाट हिरवळ असणारी रानें-कुरणें, डोंगर-टेकड्या व त्यांच्या उतारावरील लागवडीनें नटलेला आकर्षक भाग आणि एका मागोमाग ओलांडाव्या लागलेल्या लहानमोठ्या खाड्या या सर्वांचीं दृश्यें मला फारच प्रेक्षणीय वाटलीं.

**जपान देश** उद्योगधंद्यांत फारच पुढारलेला. मोठमोठ्या कारखान्यांची तर तिथं पुष्कळशा ठिकाणीं ओळीनें नुसती रीघच लागलेली आहे. त्याशिवाय बहुतेक प्रत्येक घरांतील कुटुंबांतूनहि हस्तव्यवसाय या सदरा-खालील कोणता ना कोणता उद्योग नेहमीं चालूच असतो. त्यामुळें तिथल्या प्रवासांत अशा कारखान्यांच्या भव्य इमारती, त्यांच्या उंच आणि हवेंत धूर सोडणाऱ्या चिमण्या अंतराअंतरावर दिसतात.

**जपानमधल्या** प्रवासांत प्रेक्षणीय स्थळांच्या जोडीला चटकन् लक्षांत भरणारी आणखीन् एक गोष्ट ठळकपणें दिसली ती म्हणजे रानांतून, शेतां-तून, जंगलांतून व डोंगराच्या उतरणीला विविध आकारांच्या व उद्योगधं-द्याच्या निदर्शक अशा मोठमोठ्या जाहीरातीच्या पाट्या ! भरवस्तींतून अन् हमरस्त्यावर तर त्यांचें वैपुल्य अगणितच होतें. यावरून तेथें मानण्यांत येणारें जाहिरातीचें विलक्षण महत्त्व लक्षांत येतें.

**ओसाका—**

**संध्याकाळीं** आम्ही ओसाका स्टेशनवर उतरलों, टॅक्सी केली अन् पूर्वनियोजित हॉटेल गाठलं. ओसाका येथें बहुधा दरवर्षी कसलेंना कसलें प्रदर्शन असतेंच. त्यावर्षीचें आंतरजागतिक प्रदर्शन तिथें होतं. प्रदर्शनाच्या

निमित्तानें येणाऱ्या बहुतेक प्रवाशांची रहाण्याजेवण्याची सोय होईल इतकें भव्य हॉटेल बांघण्यांत आलें आहे. त्याचं नांव International Fair Hotel असं आहे. तिथें पोचल्यावर सामान खोलींत ठेवलें, प्रवासांतले कपडे बदलून चहाखाणें उरकलें, अन् जें पाह्यला मिळेल तें थोडसं पहावं म्हणून बाहेर पडलों. प्रदर्शनाची वेळ सकाळीं ९ ते सायंकाळीं ५ अशी होती. थोडेसें जवळच्याच रस्त्यानें हिंडून आलों. संध्याकाळची वेळ असल्यानें रस्त्यावर फारच गर्दी होती. बाजारवस्तींतून हिंडतांना पाहिलें तर दर दोनतीन दुकानांनंतर एकादं हॉटेल, किंवा खाद्यपेयांच्या वस्तूंचें दुकान असे. आपल्याकडे जसं शेव, चिवडा व गोड पदार्थ दर्शनी विभागांत कांचेच्या कपाटांतून ठेवलेले असतात तद्वत जपानी हॉटेलांतून भाताचे, अन् माशाचे वेगवेगळे पदार्थ कांचपात्रांत व येणाऱ्या जाणाऱ्यांना दिसावेत असे ठेवलेले असतात.

दुसऱ्या दिवशीं मात्र चहा व खाणें संपवून प्रदर्शन पाह्यला निघालों. प्रदर्शनांतील कापडविभाग आमच्या हॉटेलच्याच इमारतींत होता. प्रदर्शन पाह्यला आम्ही चौथ्या मजल्यापासून सुरवात केली. दरएक मजल्यावरील स्टॉल्स उत्तमोत्तम कापडांनी सुसज्ज व शोभिवंत दिसत होते. गरम कपडा, सुती कापड, नायलॉन, रासायनिक तऱ्हेनें बनवलेलें कापड व त्यांच्या डिझाइनचे अगणित प्रकार पाह्यला मिळाले. कापडावरील डिझाइन्स तर इतक्या विविध प्रकारच्यीं होतीं कीं त्यांची मोजदाद अथवा तपशीलवार माहिती सांगता येणें अशक्य आहे ! प्रदर्शनाचा हा कापडविभाग वेळेच्या अभावीं धावतपळत पाहिला. नंतर मोठें प्रदर्शन पाह्यला गेलों. हें प्रदर्शन लोखंड, प्लॅस्टिक वगैरेंच्या मदतीनें कायम उभारलेल्या अर्धवर्तुळाकार इमारतींत भरलें होतें. प्रदर्शनापाशीं आल्यावर आम्ही आपसांत विभाग वाटून घेतले. यांत्रिक व रासायनिक विभागांकडे जगन्नाथ गेले. मी काचेच्या वस्तू, दागिने, सौंदर्यप्रसाधनें, वाद्यविभाग असल्या विभागांतून हिंडलें. दुपारीं जेवणाच्या वेळीं आम्ही सर्व संकेतस्थळीं भेटलों, जेवलों अन् खाजगी मोटारीनें मी, जगन्नाथ व श्री. कवाशिमा क्योटोला जायला निघालों.

कयोटो—

ओसाका ते कयोटो प्रवास मोटारीनें केला दुपारीं पावणेतीनला आम्ही कयोटोंत पोचलों. तेवढें अंतर आम्ही त्या मानानें फारच थोड्या वेळांत तोडलें. एक तर रस्ता पुष्कळ रुंद, चांगला आणि गाडी हाकणारा सराईत. एका रात्रीपुरती आमची उतरण्याची सोय Kyoto Hotei मधें केली होती. थोड्याच वेळांत आदल्या दिवशीं कांहीं कामासाठीं गेलेले श्री. ओकुमा आमच्यांत येऊन पुन: दाखल झाले. चहापाणी उरकल्यावर आम्ही तिघे तिथल्या जपानी पद्धतीच्या लांकडी बांधणीच्या एका थिअेटरमधें नृत्य पाह्यला गेलों. थिअेटर बाहेरच Tea House होतें. त्याठिकाणीं समारंभानें घ्यावयाच्या चहाचें प्रात्यक्षिक एका नर्तिकेनें करून दाखवलें. केकसह चहाचा कप पुढें आला. केकचा तुकडा तोंडांत टाकून चहा प्राशन केला. केकची वशी प्रेक्षकांनीं बरोबर घेऊन जायची प्रथा मात्र नवीन वाटली. आमच्या वशा आम्ही रात्रीं हॉटेलमधल्या नोकराला देऊन टाकल्या !

जपानी नृत्य कसं असतं याचें सविस्तर वर्णन मीं मागें केलेंच आहे. हेंहि नृत्य त्याचप्रकारचें, फक्त कथा व हावभाव वेगळे इतकंच. विजेच्या बटनाचे मदतीनें स्टेजवरील डेकोरेशनचे पडदे चटकन् बदलले जातात. त्यादिवशीं नृत्यांत समुद्राची प्रार्थना, ऋतूंचें महत्त्व दाखवणारें नृत्य, ज्वालामुखीची प्रार्थना असे प्रकार दाखवले. संध्याकाळीं कार्यक्रम संपल्यावर दोनतीन सार्वजनिक बागा पाहिल्या, व खोलीवर परतलों. श्री. ओकुमा त्याच रात्रीं नागोयाला परत जाणार होते. दुसऱ्यादिवशीं सकाळ पासून गाडींत बसेपर्यंत आम्ही जगन्नाथांचे एक जपानी मित्र श्री. कबुटो यांचे पाहुणे होतो. कयोटो हें जपानच्या जुन्या राजधानीचें शहर. त्यामुळें ठिकठिकाणच्या अैतिहासिक जुन्या वस्तूंचे त्याठिकाणी जतन करून ठेवलेलें आढळतें. सकाळीं सर्व सामान श्री. कबुटो यांच्या मोटारींत ठेवलें. हॉटेलचे पैसे भरले व कयोटोंत भटकायला निघालों.

सर्वांत प्रथम हेन श्राइन ( Heian Shrine ) मंदिर पाहयला

गेलों. या मंदिराच्या चतुःसीमा फार आकर्षक आहेत. प्रथम खूप मोठें प्रवेशद्वार लागतें. दोन खूप उंच खांबावर आडवें नक्षीकाम केलेलें लांकूड, व दगडी बांधकाम करून या कमानी केलेल्या असतात. कमानींतून आंत गेल्यावर मंदिर लागतें. देवळाची बांधणी अतिशय कलापूर्ण व आकर्षक असते. दगड चुन्याचे बरोबरीनें लांकडाचाहि वापर यांत आढळतो. मंदिराच्या मागच्या अंगणांत तळें, आणि त्याभोंवतीं विविध फुलझाडांची बाग पाहून मन प्रसन्न होतें. त्यानंतर दुसरें स्थान पाहिलें. त्याचें नांव नीजो कॅसल ( Nijo Castle ) होय. याचें नांव नीजो कॅसल असलें तरी हा राजवाडा आहे. हा राजवाडा बांधतांना देखील लांकडाचा वापर केलेला दिसून येतो. राजमहालावरील शाही मानचिन्ह सोनेरी रंगामुळें चमकत होतें. असें म्हणतात कीं, एके काळीं ही मानचिन्हें सुवर्णाचींच होतीं. राजवाड्याचे भोंवतीं सुंदर बाग आहेच. चहूं बाजूंनीं खंदकासारखी बांधणी होती. त्यानंतरचें ठिकाण आणखीनच सुंदर होतें. तें म्हणजे Golden Pavilion किंवा किन्काकुजी होय.

एका अतिशय सुंदर तळ्याचे काठीं ही एक तीन मजली पण बरेंचसें लांकूड वापरून बांधलेली इमारत आहे. या इमारतीचा संपूर्ण रंग चमकता सोनेरी आहे. याहि इमारतीचें बांधकाम केव्हांतरी सोन्याचा बराच वापर करून केलेलें होतें असं सांगतात. आतां मात्र त्या वैभवाची केवळ स्मृति म्हणून सोनेरी रंगांत इमारत उभी आहे. आपल्याकडे जसा ताजमहाल वेगवेगळ्या वेळीं पहातात, म्हणजे पौर्णिमेच्या दिवशीं रात्रीं, सकाळी, उगवत्या सूर्य प्रकाशांत, त्याचप्रमाणें ही इमारत निरनिराळ्या वेळीं पहाण्यासाठी इथें पाहुण्या प्रवाशांची गर्दी असते. त्यानंतर Sanjusangendo Temple पाहिलें. ही इमारत खूप लांब रुंद आहे. बांधणी जवळजवळ सर्व लांकडीच आहे. हें ख्रिस्ती सनापूर्वी ११६० मध्यें बांधलं असं सांगतात देवळाच्या मुख्य दिवाणखान्यांत शस्त्रधारी सैनिकांच्या धातूच्या पुष्कळच मूर्ति उभ्या आहेत. या दिवाणखान्याचे आवारांत सभोंवतालीं १५ फूट उंचीच्या ३३ देवतांच्या मूर्ति आहेत. प्रत्येक मूर्ति चौथऱ्यावर उभी असून

भोंवतीं तारांचे जाळीचें कुंपण आहे. आश्चर्य असें कीं, या मूर्तींपुढें तेथें येणारांनीं भाविकतेनें टाकलेल्या येनची व नोटांची रास आहे. पण ती संपत्ति तिथेंच उघड्यावर पडून आहे.

**त्यानंतरचीं** कांहीं ठिकाणें मात्र ओझरतीं पाहिलीं. हिरोसावा तलाव हा बोटिंगसाठीं प्रसिद्ध आहे. चेरीब्लॉसमचें गुलाबी प्रतिबिंब त्या तलावात फारच सुंदर दिसत होतें. आराशियामा विभागांतील तेंडचुनो देऊळ बघितलें. तेथील भोंवतालची वनश्री तेथील रहिवाशांना नैसर्गिक उद्यानाप्रमाणें वाटते. त्याचप्रमाणें City Park मधील बुद्धाची मूर्ति पाहिली. ही आसनस्थ मूर्ति पंचवीस फूट उंच आहे. स्टेशनजवळ म्युझियम पहाण्यासारखा होता. पण आमची नागोयाला जाणारी गाडी यायची वेळ होत आली, म्हणून घाईनें स्टेशन गांठलें. श्री. कबूटो यांचा निरोप घेतला अन् कयोटो सोडलें. साधारण-पणें दोन तासांच्या प्रवासानंतर संध्याकाळीं आम्ही नागोया स्टेशनवर उतरलों.

## नागोया

**नागोया** स्टेशनवर स्वत: श्री. ओकुमा व त्यांच्या पत्नि जातीनें हजर होत्या. नागोयांतल्या मुक्कामांत आमची सोय तिथल्या प्रसिद्ध Kanko Hotel मध्यें केली होती. आमची सर्व सोय लागलेली पाहून मग ती दोघे परत गेली. दुसरा दिवस रविवारचा होता. थोडें दिवस राह्यचें होतें, म्हणून बॅगमधलें सामान काढून कपाटातून लावलें. मुंबईहून निघतांना आमच्या कारखान्याच्या (Investa Machine Tools Eng. Co.) कामगारांनीं कांहीं वस्तु भेटीदाखल दिल्या होत्या. ती भेट (Okuma Machinary Works) च्या कामगारांना द्यायची होती. वस्तू इतक्या लांबचा प्रवास करून सुरक्षित आल्या आहेत कीं नाहीं तें पहाण्यासाठीं तें पार्सल मी एक दिवस आधींच उघडून पाहिलें. दुसऱ्या दिवसापासून तिथल्या जीवनाला सुरवात झाली. बरोबर सकाळीं ९ ला कारखान्याची गाडी

जगन्नाथ यांना न्यायला येत असे. सकाळीं ९ ते संध्याकाळीं ५ पर्यंत ते कारखान्यांत कामाकरितां जात असत. त्या अवधींत हिंडून नागोया शहरांतलीं स्थळें पाहण्याचा माझा विचार मी श्री. ओकुमांना बोलून दाखवला. त्यांनीं लगेच मला एक बाई गाईड म्हणून दिली. पहिल्या दिवशीं सकाळीं आम्ही नागोया कॅसल (Nagoya Castle) पाहयला गेलों.

**टॅक्सी** किल्ल्याच्या पायथ्याशीं जाऊन उभी राहिली. किल्ल्याभोंवतालचें खूप उंच आवार दगडांनीं बांधून काढलें आहे. या भिंतीवर टेहेळणी बुरुज आहेत. बुरुजावर छप्पर घालून बांधलेल्या चौक्या आहेत. छप्पराचें काम मात्र संपूर्ण लाकडींच आढळलें.

**किल्ला** पाहयला उत्सुकतेनें गेलें पण किल्ला पाहयला मिळाला नाहीं. कारण किल्ल्याचें बांधकाम चालू होतें. युद्धकाळांत बाँबवर्षावाची फार मोठी झळ या शहाराला लागली. सबंध शहराची पडझड व नासधूस फार मोठ्या प्रमाणांत झाली होती. तरीपण फारच थोड्या अवधींत संपूर्ण शहराची अद्यावत बांधणी पूर्ण केल्याचें आढळलें. शेती, कारखाने, शिक्षण, धंदे सर्व लागीं लावतां लावतां देशाच्या जुन्या मौल्यवान आठवणीची जपणूक ज्या ज्या प्रकारांनीं करतां येईल या दृष्टीनें बांधकामें अद्याप सुरू आहेत. युद्धकाळांत जमीनदोस्त झालेला किल्ला पुन्हां रूप धरत होता. या किल्ल्याभोंवतीं पाण्याचा खंदक आहे. त्यापैकीं कांहीं भाग पाण्यानें भरला होता, तर कांहीं भागावर भर घालून त्यावर शेती केलेली दिसत होती. किल्यापासून रस्त्यापर्यंत वाळू टाकलेली असल्यानें भरभर चालणें जमत नाहीं किल्ल्याच्या आवारांत थोडीशी बागहि आहे. या बागेंत व्यवस्थित कुंपण घालून एका झाडाची विशेष जपणूक केलेली आढळली, म्हणून जवळ जाऊन त्यावरील सूचनाफलक वाचून पाहिला, त्यावरून कळलें कीं तें झाड ६०० वर्षांचें जुनें होतें. जपानी भाषेंत त्याचें नांव ' खाया ' आणि त्याचें इंग्लीश नांव 'तोरोया' (Torroya) असें होतें

किल्ला पाहून झाल्यावर " टेरिव्हीजन " टॉवर पाह्यला गेलों नांव कानाला विचित्र वाटलें. पण तसा उच्चार जपानी लोक करतात हें मात्र खरं ! जपानमधल्या लोकांना टेलिव्हिजनची ओळख अलिकडेच झाली आहे. तरी पण ठिकठिकाणीं सेटस् दिसतात. टेलिव्हिजन टॉवर चढून जाण्यासाठीं लिफ्ट दोनदां बदलावें लागतें. लिफ्टमधून जिथें आपण प्रथम बाहेर पडतो तो पहिला मजला होय. इथें संपूर्ण फेरी घालून दुसऱ्या लिफ्टमधून आपण वरच्या मजल्यावर जातो. पहिल्या मजल्यावरच्या प्रेक्षकांच्या गॅलरींतून रस्त्यावरचीं वाहनें, माणसें, इमारती स्पष्ट व मोठ्या दिसतात. परंतु वरच्या मजल्यावरच्या गॅलरींतून रस्त्यावरचीं तींच दृश्यें फार लहान दिसतात. हा संपूर्ण मजला प्लॅस्टिकच्या तावदानांनीं बांधून काढलेला आहे. इथें हॉटेल्स, दुकानें सर्व कांहीं आहे. संपूर्ण T. V. पाहून झाल्यावर आम्ही लिफ्टमधून उतरून खालीं आलों.

वाटेंत एका हॉटेलमधें थोडेसें खाऊन आम्ही दोघीजणी पुन्हां बाहेर पडलों. दुपारीं तोकुगावा म्युझिअम पाह्यला गेलों. तिकीटें काढलीं. तिथल्या पद्धतीप्रमाणें चपला दाराशीं काढून ठेवून गवती सपाता घालून म्युझिअम-मधें गेलों.

फक्त दोन मोठ्या हॉलमधें म्युझिअमची मांडणी केलेली आहे. त्या म्युझिअम मधल्या निवडक गोष्टींचा उल्लेख केल्याशिवाय रहावत नाहीं. प्राचीनकाळीं राजघराण्यांतले स्त्री-पुरुष जे कपडे वापरीत असत त्या नमुन्यांचे कपडे कपाटांत ठेवले आहेत. तसेंच शिकारीला जातांना घाला-वयाचे हरतऱ्हेचे पोषाख दुसऱ्या एका कपाटांत होते. कांहीं कपाटांतून जपानी राजवाड्याच्या भिंती ठेवल्या होत्या. भिंती ठेवल्या होत्या हें वाच-तांना चुकल्यासारखं वाटेल ! पण जपानी घराच्या भींती लहान लहान चौकोनी आकाराच्या लाकडी फळ्यांच्या असून त्यांवरून रंगीत नक्षीकाम, देखावे, चितारलेले होते. कांहीं कपाटांतून जावा, सुमात्रा, बोर्नियो वगैरे ठिकाणांहून आणवलेल्या वस्तूहि मांडलेल्या होत्या. म्युझिअम-

मधें गर्दी खूप होती. शाळेंतील मुलांमुलींची संख्या त्यांत फार होती. मौज अशी कीं, त्या दिवशींच्या गर्दींत साडी नेसून वावरणारी अशी मी एकटीच होते. मला पाहतांच कांहीं मुलांमुलींनीं म्युझिअम पाहयचें सोडून माझ्याभोंवतीं घोळका केला. त्यांतील चिटुकल्या मुलींनीं गाईडच्या मदतीनें मला वेगवेगळे प्रश्न विचारले. " या पेहेरावाला काय म्हणतात ? तुमच्या देशात सर्व स्त्रिया असेच कपडे घालतात कां ? काम करतांना तुम्हाला त्याचा त्रास होतो कां ?" त्यांनीं आपल्या मित्रमैत्रिणींनाहि मला पाह्यसाठीं मुद्दाम बोलावून आणले. तीं मुलें सारखी माझ्या मागें मागें येऊन मला कुतुहलानें पहात होतीं. त्यामुळें मी पण म्युझिअममधलीच वस्तू आहे असं क्षणभर मला वाटूं लागलं !

**म्युझिअम**नंतर फक्त निकुताओजी मंदिर पाहयला मी व हिसाको ( माझ्या गाइडचें नांव ) गेलों. या मंदिराच्या दाराशीं खूप मोठी लांकडी कमान आहे. कमान ओलांडून पुढें गेल्यावर एक छोटीशी टेकडी चढून जावी लागते. पायऱ्या चढून गेल्यावर खूप मोठा हॉल लागतो. हॉलमध्यें सर्वत्र चटया अंथरलेल्या असतात. हॉलमधें असणाऱ्या मुख्य गाभाऱ्यापुढील जागा रंगी बेरंगी कागदांच्या हरतऱ्हेच्या माळा, पताका अन् तोरणांनीं सजवलेली होती. गाभाऱ्यांत जाऊन पाहिलें तर तिथें मूर्ति, प्रतिक वा प्रतिमा यांपैकीं कांहींहि नसून फक्त आरसा ठेवलेला होता. त्या आरशापुढें असणाऱ्या तबकांत मेणबत्त्या–उदबत्त्यांचा ढीग दिसला. येणारी मंडळी तबकांत कांहीं येन टाकीत व मग त्यांतील उदबत्ती घेऊन ती लावून ठेवून जात असत. आपल्याकडील मंदिरांतून चालतात त्याप्रमाणें दुपारीं तिथें धार्मिक प्रवचनेंहि चालतात. तीं ऐकण्यासाठीं वयस्क व धार्मिक प्रवृत्तीचे लोक त्या ठिकाणी बहुसंख्येनें जमा होतात ही गोष्ट मुद्दाम नमूद करण्याजोगी आहे.

**दुसऱ्या** दिवशीं जपानच्या राजाचा वाढदिवस होता. त्यामुळें ठिकठिकाणीं मोठ्या उत्साहानें निरनिराळे समारंभ साजरे करण्यांत आले. सकाळीं नऊ वाजतां मी माझ्या गाइडबरोबर बाहेर पडलें. शहरांतल्या

तोयोदा हॉलमध्यें राजाच्या वाढदिवसानिमित्त होणारे छोटचा छोटचा मुलांचे कार्यक्रम पाहायला प्रथम गेलों. तिथल्या हॉलमध्यें पियानो-वादनाचा कार्यक्रम होता. पांच वर्षांपासून साधारण बारा वर्षांपर्यंत वयाच्या मुलांनीं पियानोवर विविध गाणीं व सुरावटी वाजवून दाखवल्या. पालकवर्ग फार मोठचा संख्येनें हजर होता. तोयोदा बिल्डिंग ही सहासात मजली व अवाढव्य इमारत आहे. शेवटच्या मजल्यावर तोयोदा कंपनीची मुख्य कचेरी आहे. बाकीची सर्व इमारत भाडचानें दिली आहे. कार्यक्रम पाहून झाल्यावर व इमारत बघून झाल्यावर आम्ही तिथून बाहेर पडलों. नंतर भुयारी रस्त्यानें भुयारांतल्या बाजारांत हिंडायला गेलों. तिथेंच दुपारचें जेवणहि घेतलें. या भुयारी रस्त्यावरून हिंडतांना जरी गर्दी असली तरी शांत वाटत. भुयारा-वरून जाणाऱ्या ट्राम, बसेस अन् मोटारी यापैकीं कशाचाहि आवाज कानीं येत नाहीं. बाजारांत दिवसाहि दिव्यांचा झगझगाट असतो. भुयारांतून बाहेर पडल्यावर नाकामुरा श्राइन पाह्यला गेलों. इथेंहि आवारांत सुंदरसा तलाव व फुलझाडांची गर्दी होतीच; पण विशेष म्हणजे घसरगुंडचा, झोपाळे, सीसॉ वगैरे खेळहि होते. तेथील आवारांत लग्नगृह (City Wedding Hall) आहे. लग्नगृहांत सदैव लगीनघाई व भारीभारी जपानी वेषभूषा घातलेले लोक आढळतात.

त्यानंतर C. B. C. हें तिथलें आकाशवाणीचें केंद्र पाह्यला गेलों. एका भव्य इमारतींत हें केंद्र आहे. प्रत्येक मजल्यावर निरनिराळ्या हॉल-मधून विविध तऱ्हेचीं कामें चालतात. रेडियोचे कार्यक्रम, ध्वनिमुद्रण, आवा-जाची परीक्षा, कार्यक्रमाची चांचणी वगैरेची एकच धांदल चाललेली दिसून येत होती. इमारतीच्या शेवटच्या मजल्यावर खूप मोठा हॉल आहे. ज्यावेळीं आकाशवाणीचा प्रेक्षकांसमोर होणारा कार्यक्रम असेल तेव्हां तो या हॉलमध्यें होतो. अडीच ते तीन हजार प्रेक्षक एकावेळीं आरामांत या हॉलमध्यें बसूं शकतात. यावरून त्याच्या भव्यतेची कल्पना येईल. आकाशवाणी केंद्र पाहून झाल्यावर मात्र त्या दिवसापुरता तरी भटकण्याचा कार्यक्रम संपला होता.

रोज कांहीं ना कांहीं नवीन नवीन पहाण्यांत माझा प्रत्येक दिवस फार लौकर संपत होता. एक दिवस मी व गाईड नागोया बंदर पाह्यला गेलों. वास्तविक तें सर्व मुंबईला पाह्यला मिळतंच कीं! पण परक्या ठिकाणीं गेलं कीं पहाण्याची उत्सुकता अन् हांव वाढते हें खरं ! रोजच्या हिंडण्यामुळें कांहीं कांहीं रस्ते आतां चांगले ओळखीचे झाले होते. नागोया बंदराकडे जाणारा रस्ता ओळखीचा होता. बोटीवर माल चढवणें, उतरवणें या कामाची एकच धांदल चालू होती. अवजड कामें पार पाडण्यास मोठमोठ्या क्रेन्सची मदत घेणें चालू होतें.

तिथून एक रेसकोर्स पाह्यला गेलों. इथें सायकली व मोटारसायकलींच्या शर्यती चालतात. तिकीटें घेऊन आंत बसणाऱ्या प्रेक्षकांसाठीं तर छानच सोय केली आहे. परंतु फुकट बघणारांनासुद्धां उंचावर गॅलऱ्या बांधल्या आहेत. रेसकोर्स पाहून गांवाकडे परततांना वेगळ्या बांधणीच्या इमारतींची एका मोठ्या आवारांत गर्दी दिसली म्हणून गाईडला विचारलें. तिथें परदेशी लोकांची वस्ती होती. त्यादिवशींचें जेवण गाईडच्या इच्छेसाठीं जपानी हॉटेलांत घेतलें. मला जरी चाखतमाखत जेवावें लागलें तरी ती खूप होती. तिला तिच्या आवडीचे भात व मासे यांचे पदार्थ पोटभर खायला मिळाले अन् तेही माझे येन खर्चून !

दुपारीं दोनला नागोयांतील एका मोठ्या चिनीमातीच्या भांड्यांच्या कारखान्यांत आम्ही गेलों. तिथल्या कायद्याप्रमाणें गाईडला आंत यायला मिळालें नाहीं. मी, एक प्रवासी अमेरिकन जोडपें व कारखान्यांतील गाईड मिळून आम्ही कारखाना पाह्यला सुरवात केली. कारखान्याच्या पहिल्या दालनांत जिकडे तिकडे चायना क्ले, बॉल क्ले, वगैरे प्रकारच्या दगडांच्या राशी पडल्या होत्या. जॉ क्रशर, होज् रनर, बॉल मिल्, प्लंजर वगैरे नांवाच्या अजस्र यंत्रांमधून दगड फोडण्याचें, कुटण्याचें, दळण्याचें, चाळून पीठासारखें करण्याचें व त्यांत इतर रासायनिक वस्तू मिसळून ती माती घट्टसर भिजवून त्याचे मळून गोळे करण्यापर्यंतचें काम चालतें. सरकत्या पट्ट्यावरून ते गोळे

कारागिरांपुढें सरकत जातात. वेगवेगळ्या विभागांतून कपबशा, किटल्या, डिशेस, जेवणाचीं भांडीं, फुलदाण्या, शोभेचे पशुपक्षी वगैरे वस्तू त्या गोळ्यांतून आकार घेत असतात. या आकार घेतलेल्या वस्तू पुढेंपुढें सरकतात. वाटेंत त्यांना खूप विद्युत्शक्तीच्या दिव्यांपुढून जावें लागतें. त्यामुळें त्या वस्तु सुकत जातात. त्या सुकून खडखडीत होण्यासाठीं त्यांना Biscuit firing नांवाच्या खोलीतून जावें लागतें. तेथून बाहेर आल्यावर त्यांची तपासणी होते. कांहीं विभागांतून कांहीं वस्तूंवर हातानें रंगीत चित्रें काढून तीं रंगवलीं जातात व तीं पुन्हां सुकवलीं जातात. कारखान्यांतून बाहेर पडण्यापूर्वी मात्र त्या सर्वांची शेवटची काळजीपूर्वक तपासणी होते. बाजारांत, आणि विशेषत: परदेशी बाजारांत कारखान्याचें नांव खराब होऊं नये म्हणून काळजीपूर्वक चांगलाच माल बाहेर जाईल याविषयीं खबरदारी बाळगली जाते.

या Inspection Room मधला खळखळाट ऐकवत नाहीं. रंग, रूप, आकार, पक्केपणा, सुबकता या सर्व कसोटयांतून चांगली ठरणारी वस्तू पॅकिंग खात्याकडे रवाना होते. पण चांगली न ठरणारी वस्तू मागें ठेवलेल्या टोपलींत फेंकली गेलीं कीं खळकन् फुटते. घरांत आम्ही बायका जरासा टवका उडलेला सट मीठचटणी ठेवण्यासाठीं चालवून घेतो. नळाखालीं धुतांधुतां (साबणाच्या हातांतून) बशी निसटून फुटली तर कितीतरी हळहळत रहातो. तिथें तर सुबक भासणाऱ्या वस्तू फुटत होत्या, त्यामुळं त्यांचा खळखळाट ऐकतांना कसंतरीच वाटत होतं.

त्या कारखान्यांत जवळजवळ साडेतीन हजार कामगार आहेत. मातीच्या गोळ्याला आकार देणें, ओझीं उचलणें, वगैरे कामें पुरुष करतात; सुबक वस्तू निर्माण करणें, त्यांवर चित्रें काढणें, रंग भरणें व कारकुनीचें कार्य पार पाडणें वगैरे कामें स्त्रिया करतात. कारखान्याच्या बाहेरच्या हॉलमध्यें खूप मोठ्या बशींत असा एक अवाढव्य कप होता कीं त्यांत घागरभर पाणी

सहज मावलें असतें. त्याचा उपयोग रंगीबेरंगी फुलांचे आकर्षक गुच्छ त्यांत खोवून फुलदाणीसारखा केला होता.

**कारखाना** पाहून झाल्यावर मी जेव्हां घड्याळ पाहिलें तेव्हां गाईडला निरोप द्यायची वेळ होऊन गेली होती. इतका सुंदर कारखाना व त्यांतील अतिशय सुंदर वस्तू पाहून झाल्यानें दुसरं कांहीं नव्यानें पाह्यला जावें असं वाटत नव्हतं, म्हणून गाईडला परभारे जायला सांगून मी खोलीवर परत आलें.

**नंतरचा** दिवस उगवला ती मेची एक तारीख होती. त्यादिवशीं गाईड येणारच नव्हती. ओकुमा वर्क्स चालू असल्यानें जगन्नाथ सकाळींच कारखान्यांत गेले होते. सबंध दिवसभर कुठेंहि जाण्याची घाई नसल्यानें मीं घरचे सर्व कार्यक्रम आरामांत पार पाडले. त्यादिवशीं वर्तमानपत्र अगदीं सावकाशीनें वाचलें. आमच्याकडे आम्ही रोज ‘ The Japan Times ’ हें वर्तमानपत्र घेत होतों. संध्याकाळच्या वेळीं ‘ Asahi Evening News ’ मिळत असे. तशीं वर्तमानपत्रें पुष्कळच निघतात तिथेंही; मीं आपली नमुन्यासाठीं नांवें सांगितलीं इतकंच. डायनिंग हॉलमधें जाऊन बारा वाजतां जेवून आलें व मग बॅग भरायला घेतली. कारण आल्यापासून निवांतपणाचा असा तोच पहिला दिवस होता. बॅग भरून कुठें जायचें नव्हतें म्हणा. पण हिंडतां हिंडतां घेतलेल्या बऱ्याच नाजूक वस्तू, सुरक्षित व जशाच्या तशा घरापर्यंत पोचाव्यात या हेतूनें त्या व्यवस्थित ठेवणें जरूरीचें होतें. म्हणून ती बॅग अशा दक्षतेनं भरली कीं भारतांत परत आल्यावर कस्टम अधिकाऱ्यांसमोरच ती मी नंतर उघडली. आणि सांगायची गोष्ट म्हणजे माझी बॅग पाहून ते अधिकारी मनापासून हंसले ! कारण त्या बॅगेंत चिनी मातीच्या छोट्या वस्तू, बांबूच्या वस्तू, खेळणीं, पंखे, आणि लहान मुलें खुष होतील अशा सर्व वस्तू होत्या. या वस्तू जमवतांना मी अक्षरश: बालमन व शिशुवृत्ति धारण केली होती हें कुणाच्याहि सहज लक्षांत आलें असतें. नमुन्यासाठीं नांवे सांगतें. पण तीं न हंसता वाचणें साधणार नाहीं. उदाहरणार्थ विविध प्रकारचीं सिगारेटचीं रिकामीं पाकिटें

(कोणाचें नांव Peace तर कुणाचें कांहीं) सिगारेटच्या पाकिटांबरोबर व हॉटेलांतून कुठेंहि काडयाच्या पेटया तर फुकटच मिळत होत्या, त्या विविध चित्रांच्या रिकाम्या काडयाच्या पेटयाहि मीं साठवल्या होत्या. रंगीबेरंगी कागद (जे वस्तू बांधण्यासाठीं वापरतात), फुलांचीं चित्रें, ओसाकांतल्या मुक्कामांत प्रदर्शन पहातांना मिळालेल्या जाहिराती आणि माहिती पुस्तिका, आकर्षक वस्तूसाठीं वापरलीं जाणारीं सँपल पार्सलें अशा एक ना अनेक वस्तूं-मुळें कपाटांत पसारा वाढला होता. त्या सर्व वस्तू बॅगेंत भरून त्याला कुलुप लावून टाकलें. मग दुपारचा चहा घेतला आणि नातेवाईकांना पाठवायचीं पत्रें लिहिलीं. संध्याकाळीं मात्र दोघंजण बाजारपेठेंत फिरायला जाऊन आलों.

**दुसऱ्या** दिवशीं माझ्यासाठीं नवीन गाईड येणार होती. ती आल्या-वर सकाळी ९॥वाजतां मी व मिस् ताजिरी-माझी नूतन गाईड-आम्ही दोघी बाहेर पडलों. दहाचे सुमारास जवळच्याच एका किंडर गार्टन स्कूलमधें गेलों. ती शाळा म्युनिसिपालिटीची होती. या शाळेंत ३ ते ६ वर्षांची मुलेमुली होती. शाळेची वेळ सकाळीं ९ ते दुपारीं १॥ पर्यंत. जेवण मुलांना शाळेंतच मिळतें. मुलांच्या प्रकृतीची काळजी, त्यांना चांगले अनुभव देणें, स्वावलंबन, मित्रत्वाची शिकवण, बोलण्याची कला, गायन, वाचन वगैरे गोष्टी शिकवल्या जातात. या शाळेंत एकूण २०० मुलें तेव्हां पटावर होतीं; दहा मास्तरणी होत्या. शाळेची म्हणून डॉक्टरीण असतेच. कुठल्याहि पाहुण्याचें स्वागत अगदीं अगत्यपूर्ण कसें करावें याचें जणूं बाळकडूच सर्वांना पाजलेलें असतें. प्रत्येक वर्गांतल्या मुलांमुलींनीं कमरेपासून वांकून अभिवादन करण्याची कवायत केली. कांहीं छोटया मुलांनीं गाईडच्या मदतीनें मला पुढीलप्रमाणें प्रश्न विचा-रले. "तुम्हाला आमच्याएवढा मुलगा किंवा मुलगी आहे कां ? त्याला कां नाहीं आणले ? त्याचें नांव काय ? त्याच्या नांवाचा अर्थ काय ? त्याला मोठा झाल्यावर आमचा देश पाह्यला पाठवाल का?" एक प्रश्न उत्तर देऊन संपला की लगेच तीं मुलें दुसरा प्रश्न विचारीत होतीं. अरूणचें नांव ( माझा मुलगा ) गाईडच्या मदतीनें त्यानीं 'निप्पान' ठरवलें. जपानी

भाषेंत मुलांनीं एकदोन अभिनय गीतें म्हणून दाखवलीं. शेवटीं पाहुण्यांच्या खोलीत केक व चहा देण्यांत आल्यावर तिथल्या अधिकारी स्त्रियांचे आभार मानून आम्ही बाहेर पडलों

नंतर एका हॉटेलमधें थोडेसें खाऊन नागोयांतलें एक डिपार्टमेंट स्टोअर पाह्यला गेलों. स्टोअरचें वर्णन करून मला पुनरावृत्ति करायची नाहीं. सर्व मजले सावकाशीनें पाहून, थोडीफार खरेदी केली. आणि मग शेवटच्या मजल्यावरची छतावरील बाग (Roof Garden) पाह्यला गेलों. ती बाग पाह्यला जाऊया म्हटल्यावर गाईडच्या कपाळाला आठी पडली. पण मीं तिकडे दुर्लक्ष केलें. जपानी लोकांनीं मुलें लहानाची मोठी करतांना त्याच्यासाठीं खूप सुखसोयी केल्याचें ऐकत होतें. म्हणून मला ती बाग पाह्यची होती. शिवाय नमुन्यादाखल एक Roof Garden पाह्यल्यावर मग प्रत्येक छतावरील बागा पाह्यला नकोत असाहि एक उद्देश होता. मुलांसाठीं केलेल्या नानाप्रकारच्या सोयी, करमणुकीचीं साधनें व खेळ पाह्यल्याशिवाय कसें समजणार? Roof Garden मधें गेल्यावर प्रसन्न वाटलें. शेवटच्या मजल्यावरच्या उंचीवर असणाऱ्या त्या बागेंत वारे नुसते भिरभिरत होते. जेवढी लांबीरुंदी इमारतीची आहे, तेवढीच विस्तृत ही गच्ची बांधली आहे. चौफेर बारा फूट उंचीचें कुंपण आहे; तेंहि जवळजवळ गज असलेलें आहे. 'मेरी–गो–राऊंड' किंवा फुलराणीसारखी मुलांची गाडी गच्चीवर फिरत असते. एका कोपऱ्यांत जत्रेंतल्यासारखा पाळणा, एका कोपऱ्यांत फिरतीं जहाजें, एका कोपऱ्यात सीसॉ, झोपाळे वगैरे खेळ, तर एका कोपऱ्यांत लहान मुलें चालवतात त्या मोटारी, असे विविध खेळ आहेत. या सर्व गोष्टी एकाच गच्चींत आहेत असे म्हटल्यावर तिच्या विस्ताराची कल्पना प्रत्येकाला येईलच. तिथें वर दोनतीन हॉटेल्सहि आहेत. या हॉटेलमधून हिरवा चहा, (Green Tea) आइस्क्रीम, ऑरेंज, तांदुळाच्या केक्स, बिस्किटें, चॉकलेट, खारे शेंगदाणे वगैरे वस्तू विकायला असतात. सकाळीं ९ ते संध्याकाळीं ६ पर्यंत ती बाग सर्वांना मोकळी असते. याच मजल्यावर पक्षांचीं दुकानें आहेत.

छोटे छोटे पक्षी पाळण्याचें मुलांना फार वेड. दुकानांतून छोटे छोटे पक्षी, पिंजरे, पक्षांचें अन्न विकत मिळतें. दुसरी दुकानें मासे विकणाऱ्यांचीं ! घरांतल्या मत्स्यालयांत सोडण्यासाठीं इथून मुलें मासे विकत नेतात. मत्स्यालयें, त्यांत टाकायची वाळू व माशांचें खाणें या सर्व वस्तू त्या ठिकाणीं विकत मिळतात.

**जपानमधें** छोटया छोटया मुलांच्या हातांतून प्लॅस्टिकच्या छोटया पिशव्या दिसतात. त्या पिशवींत पाणी भरून, दोनचार रंगीत मासे सोडलेले असतात. ह्या छोटया माशांचा खेळ बघण्यांत खूप मुलें रंगून गेलेलीं दिसतात: एका ठिकाणीं छोटेसें देऊळ व त्याभोंवतीं बाग दिसली. देऊळ अगदीं लहान होतें, म्हणून कुतुहलानें पाहून चौकशी केली. देवळांत कोल्होबासारखी मूर्ति दिसली, म्हणून ताजिरीला विचारलें. ती म्हणाली आमच्याकडे या प्राण्याला पैशाची देवता मानतात. याची पूजा चालू ठेवली कीं, खूप पैसा मिळतो. मी म्हटलं, या बागेंत ही मूर्ति नक्कीच जागृत दैवत भासणार. कारण खेळायला म्हणून मुलें जमणार, बरोबर म्हणून पालक येणार, आणि सर्व जमले कीं, तिथलीं हॉटेल्स व दुकानें यांची नक्कीच चलती होणार !

**पुष्कळ** वेळ बागेंत हिंडूनहि माझें कांहीं समाधान झालें नाहीं. आपल्याकडे छतावर अशी एकादीहि बाग नसावी याचें खरोखर वाईट वाटलें. बाग पाहून झाल्यावर उतरून खालीं सहाव्या मजल्यावर आलों. तिथें एका विभागांत १४ वर्षांपर्यंतच्या मुलांनीं मेहेनत घेऊन, वस्तू जमवून, त्याची माहिती लिहून एक प्रदर्शन भरविलें होतें शिक्षकांचें सहाय्य फक्त प्रदर्शनाची जागा मिळवून देण्यासाठीं व जाहिराती छापवून देण्यासाठीं घेतलें होतें. त्या प्रदर्शनांत (सायन्स परेडमधें) वेगवेगळ्या फुलपाखरांचे पंख, दगडांचे प्रकार, मधमाशांच्या पोवळ्यांचे प्रकार, रेशमाच्या किड्यांची वाढ, रसायनशास्त्रांतले छोटे छोटे प्रयोग, जपानची रचना, वगैरे अनेक गोष्टींची मांडणी अतिशय-आकर्षकपणें केली होती. शाळेंतल्या मुलांच्या अंगांतील गुणांची वाढ व्हावी, त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन नवीन कार्यक्रमांतून भाग

घ्यावा म्हणून जपानी शिक्षकवर्ग सदैव योग्य त्या सूचना त्यांना देऊन, प्रोत्साहन देत असतो. सायन्स परेड पाहून झाल्यावर त्या दिवसापुरता हिंडण्याचा कार्यक्रम मी संपविला.

**मेच्या** ३ तारखेला सार्वत्रिक सुट्टी होती. त्या दिवशीं श्री. अॅबे व सौ. अॅबे यांच्याबरोबर सहलीला जायचा कार्यक्रम होता. सकाळीं ९।। वाजतां आम्ही हॉटेल सोडलें. जेवणापर्यंतचा वेळ जगन्नाथांना डिपार्टमेंट स्टोअर दाखवण्यांत घालवला. शिवाय थोडीशी खरेदीहि केली. नंतर एका हॉटेलमधें जेवण घेतलें आणि मग फिरायला निघालों. हें फिरणें एका खाजगी मोटारींतून चाललें होतें. प्रथम यादा नदी ओलांडून नागोयाबाहेर पडलों. रस्त्याच्या दोन्ही कडेला गव्हाचीं गिरवींगार शेतें पसरलीं होती, तर कांहीं विभागांतून शेतें पिवळींहि झालीं होतीं. जातां जातां वाटेंत एका ठिकाणी विमानांची बरीच चाहूल आली म्हणून चौकशी केली. तें गांव **कोमाकी** (Komaki) होतें. कोमाकी हें विमानतळ असलेलें गांव आहे. त्यानंतर एकदोन गांवें गेल्यानंतर **अिनियामा** आलें. अिनियामांत शिरण्यापूर्वी एक पूल लागतो. या पुलाच्या दोन्ही बाजूला साकूराच्या गुलाबी फुलांनीं डंवरलेल्या झाडांची एकच गर्दी आहे. एरवी वर्षभर झाडांवर एकहि फूल नसतें. पण Cherry Blossom फुलला कीं तीं फुलांनीं डंवरतात. या पुलावरून गांवांत शिरल्यावर डाव्या हाताला कांहीं अंतर गेल्यावर आपण अिनियामा कॅसलच्या–पायथ्याशीं जाऊन पोंचतों. किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून किल्ल्याच्या जिन्यापर्यंत पोंचेपर्यंत अनेक छोटीं देवळें दिसतात. प्रवेशद्वाराशींच धातूचा बनवलेला एक कुत्र्याचा पुतळा आहे. गांवाच्या नावांतच अर्थाचा उलगडा होतो. इनु म्हणजे कुत्रा आणि यामा म्हणजे पर्वत होय. कुत्र्याचा पर्वत अशा कांहींशा अर्थाचें नांव त्या गांवाचें व किल्ल्याचें आहे. किल्ल्याच्या दाराशींच तिकिटें काढावीं लागतात. प्रवेशद्वारापाशीं खूप मोठ्या टोपलींत गवताच्या व प्लॅस्टिकच्या सपाता ठेवलेल्या होत्या. पायांत बूट, चपला घालून किल्ल्यांत जायला मनाई आहे.

पण सपाता घालून व हातांत बूटजोडे घेऊन गेलेलं चालतें, किंवा मग बाहेर राखणदार असतो, तो तीं संभाळतो. त्याला थोडे येन दिले कीं झालें.

**या किल्ल्याचें** बांधकाम लांकडी आहे. पांच जिने चढून वर गेल्यावर आपण किल्ल्याच्या शेवटच्या मजल्यावर येतो. खूप उंचीवर पोचल्यानें वारा अगदीं खूप येत असतो. इथें खूप मोठा हॉल असून, चौफेर गॅलरी आहे. हॉलमधें किल्ल्याच्या बांधकामाचे इसवी सनांक, बांधणाऱ्या जहागिरदाराची वंशावळ, आदि गोष्टी लिहिलेल्या पाह्यला मिळतात. किल्ल्याला खिस्सो नदीचा वेढा आहे. गॅलरीतून भोंवतालची हिरवी झाडी, वाळवंटांतील महलीला येणाऱ्यांची गर्दी, झाडीतून दिसणारीं घरांचीं छपरें, हें सर्व पहातांना पांच मजले चढून आल्याचा शीण केव्हांच निघून जातो. अिनुयामा कॅसल पाहून आल्यावर मग मोटारीनें खिस्सो नदीच्या काठानें परत फिरलों. मात्र रस्ता दुसरा होता. या नदीकाठीं ' मुमुतारो गार्डन ' आहे. बागेकडे जाणारा रस्ता वळणावळणांचा आहे. एका बाजूला सारखी नदी दिसत असते; तर दुसऱ्या बाजूला हिरव्यागार टेकड्या सोबत करीत असतात. मुमुतारो नांवाच्या मुलानें कबुतरें आणि माकडें यांच्या मदतीनें त्या विभागांतील दुष्टांचा नाश केला म्हणून त्याचा पुतळा असलेलें देऊळ बांधलंय असें सांगतात. देवळाशेजारीच छोटासा म्युझिअम आहे. यांत फक्त मुमुतारोकालीन वस्तू आहेत. बागेंत मुलांसाठीं घसरगुंड्या, झोपाळे, सीसॉ वगैरे अनेक खेळ आहेत. शिवाय इथें मिठाईचीं दुकानें, खेळण्यांचीं दुकानें, नि हॉटेल्सहि आहेत. संध्याकाळीं ४॥ चे सुमाराला आम्ही सर्वांनीं हॉटेलमधें चहा व केक घेतल्या, व मोटारीनें परत नागोयाला आलों. आम्हाला हॉटेलमधें सोडून श्री. व सौ. अॅबे स्वतःचे घरीं परत गेले.

**रविवारीं** ता. ४ ला श्री. मासुमोटो यांचेबरोबर **कामोझाकी** शहरांत जायचें ठरलें होतें. सकाळीं श्री. मासुमोटो आपल्या तीन मुलांना घेऊन आमच्या हॉटेलांत आले. मग आम्ही सर्वचजण निघालों. फक्त अर्धा-पाऊण तास आमची मोटार चांगल्या रस्त्यानें चालली होती, त्यापुढील

रस्ता अगदीं साधा होता. रस्त्याच्या कडेनें शेतांची सोबत होती. अकराचे सुमाराला आम्ही त्या शहरांत पोचलों. श्री.मासुमोटो यांची मोठी बहीण याच गांवांत रहाते. त्यांच्याकडे आम्ही आधी गेलों. बहिणीची मुलगी व यजमान यांना आमच्याबरोबर घेऊन आम्ही कामोझाकी मंदिरांत गेलों, कारण त्या दिवशीं देवळांत उत्सव होता. आसपासच्या गांवांतून उत्सव पाहायला येणाऱ्या उत्साही लोकांची देवळाभोंवतीं व समुद्रकिनारीं एकच गर्दी झालेली होती. मंदिराचें तोंड समुद्राकडे असून, पायरीवर उभे राहून पाहिलें असतां सहज दिसेल इतका समुद्र जवळ आहे. स्त्रियांच्या अंगावर भारी व ठेवणींतले किमोनो दिसत होते. एरवी फ्रॉक घालून वावरणाऱ्या छोटचा छोटचा मुली सण म्हणून किमोनो घालून हिंडत होत्या. जपानी वेषभूषेंतल्या त्या छोटचा मुली फारच सुंदर दिसत होत्या. पुरुषांच्या अंगावर जास्ती सूटच दिसत होते. काहींची वेशभूषा जपानी होती.

दुपारीं १२च्या सुमाराला चार रथ समुद्रकिनारीं रस्त्यावर आणण्यांत आले. हे रथ सकाळपासून शहराला प्रदक्षिणा घालून तिथें आले होते. रथ ओढण्याचें काम माणसेंच करत होतीं. रथाच्या वरच्या मजल्यावर चांगले चांगले कपडे घालून लहान मुलें बसलीं होतीं. त्यांचें कसलींतरी गाणें म्हणणें चालूच होतें. हे चारी रथ बारानंतर वाळवंटांत आणून, त्यांचीं तोंडें देवळाकडे करून उभे केले कीं, उत्सवाचा मोठा भाग संपला असें मानतात. रथ तिथें येण्यापूर्वीं देवाची एकच पालखी आधी मंदिरांत नेली जाते. या उत्सवांत भाग घेणाऱ्यांची व पहाणाऱ्यांची खूप गर्दी होती. समारंभ संपल्यावर मग आम्ही श्री. मासुमोटो यांचे बहिणीचे घरीं गेलों.

घरीं बहिणीनें भावासाठीं सुग्रास जेवण बनवलें होतें. भाताचे प्रकार, व मासे घालून केलेले अनेक प्रकार होते. आमच्यासाठीं मात्र उकडलेल्या भाज्या, भात आणि टेंपोरा होता. शिवाय आम्ही सँडविच बरोबर नेले होते गप्पा मारीत पोटभर जेवण झालें. नंतर आम्ही त्यांचें घर हिंडून

पाहिलें. सगळीकडे अतिशय स्वच्छता व वस्तूंची आकर्षक मांडणी डोळयांत भरत होती. संडासासारखी जागाहि पण अतिशय स्वच्छ. प्रत्येकाचे घरामागें थोडीशी नॅचरल गार्डन बनवलेली, म्हणजे त्यांत थोडे मोठे दगड, छोटासा ओढा, रानांतलीं कांहीं झाडें व इतर फुलझाडे असतात. हें सर्व पुन्हां पुन्हां पाहून घेतलें. नंतर सर्वांचे फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला. जपानमधें लहानापासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच या कलेचें फार वेड ! अगदीं शाळेंत जाणारीं छोटीं मुलेंहि गळयांत कॅमेरा अडकवून हिंडतांना दिसतात !!

**संध्याकाळीं** ४ नंतर त्या सर्वांचा निरोप घेऊन आम्ही नागोयांत परत आलों. येतांना वाटेंत श्री. मासुमोटो याचे घरीं गेलों. दाराशीं मोटार थांबताच ते मागील दारानें घरांत गेले व आमच्यासाठीं त्यांनीं मोठें दार उघडलें. त्यांच्याकडे अशी एक पद्धतच कीं, दोन दरवाज्यांपैकीं घरांतल्या लोकांचा वापर मागील दरवाज्यानें असतो ! पण अगदीं कुणी परके वा पाहुणे आले तर त्यांच्यासाठीं पुढील प्रवेश दरवाजा उघडायचा ! त्यांच्याकडे पुन्हां चहा व केकचा कार्यक्रम झाला. थोडा वेळ त्यांचें घर व बाग पाहून मग आम्ही आमच्या हॉटेलमधें परत आलों.

**दुसऱ्या** दिवशीं मे ची ५ तारीख होती. मेच्या ५ तारखेला Children Day ची सुट्टी असते. आपल्याकडे दिवाळीच्या दिवसांत जसे सगळीकडे विविध प्रकारचे, रंगीबेरंगी आकाशकंदील टांगलेले दिसतात, तसे तिकडे या दिवसाची तयारी म्हणून मे च्या सुरवातीपासून प्रत्येकाच्या घरावर, उंच ठिकाणीं कागदाचे रंगीबेरंगी मासे वाऱ्यावर फडकतांना दिसतात. हा दिवस खास मुलांच्या सणाचा म्हणून मानतात. खास मुलीं-साठीं म्हणून मार्चच्या तीन तारखेला (Doll Festival) साजरी केली जाते. नोव्हेंबरच्या १५ तारखेला ' शिचिगोसान ' नांवाचा सण साजरा केला जातो. या दिवशीं साधारणपणें सात, पांच व तीन वर्षांच्या मुलांनीं यांत भाग घ्यायचा असतो. तेव्हां ५ तारखेला सुट्टी म्हणून गीफू शहर पाहयला जायचा कार्यक्रम होता.

सकाळीं दहाला आम्ही दोघे व श्री. ओकुमा असे खाजगी मोटारीनें गीफूला गेलों. या शहराचें महत्त्व म्हणजे मोसमांत इथें पक्षांकरवीं मच्छीमारी चालते. तो सोहळा व प्रेक्षकांची गर्दी अगदीं पहाण्यासारखी असते. मेच्या ११ ता. ला हा मोसम समारंभानें सुरू होतो व १५ ऑक्टोबरपर्यंत चालतो. याला जपानी लोक उकाअी म्हणतात. पण इंग्लीश नांव मात्र Cormorant Fishing असें आहे. गीफू शहरांतून वहाणाऱ्या प्रसिद्ध नागारा नदींत ही मच्छीमारी चालते. हिवाळ्यात लोक कॉरमोरांट पक्षांना पकडतात व तेव्हांपासून त्यांना पाळून शिक्षण देतात. मेच्या ११ ता. पासून रोज रात्रीं ही मच्छीमारी चालते. प्रत्येक होडींत साधारण चारसहा माणसें असतात. गीफू शहर कागदाच्या कंदिलाकरताहि प्रसिद्ध आहे. रात्रीं होडीवर कंदिलांची गर्दी असते. अशा अनेक होड्या नदीच्या पात्रांत असतात. मुख्य कोळी एकावेळीं दहाबारा पक्षी नदींत सोडून, त्यांच्या दोऱ्या नाचवत असतो. पैकीं प्रत्येक पक्षी मासा पकडून आपल्या गळ्याभोंवतीं टाकतो व नंतर कोळी हे मासे टोपलींत टाकतात. या मोसमांत गीफू शहरांत परदेशी पाहुण्यांची व जपानमधल्या रहिवाशांची एवढी गर्दी होते कीं, रहायला हॉटेल्स कमी पडतात. गीफू शहरांतली ही कॉरमोरांट मच्छीमारी जगप्रसिद्ध आहे. तिथं आम्ही सबंध दिवस काढला. नदीकिनारीं हिंडून आलों. एका हॉटेलमध्यें जेवण व चहा घेतला आणि शहरांतून फेरी मारून संध्याकाळीं नागोयांत परत आलों.

त्यानंतर दुसरे दिवशीं म्युनिसिपल शाळा पाहिली. अगदीं लहान मुलांसाठीं किंडरगार्टन किंवा बालक मंदिरें असतात; तीहि म्युनिसीपालिटी चालवतें. अशा अनेक शाळा ठिकठिकाणीं आहेत. मुलांना, समाजांत वावरतांना वागावें कसें, नम्रता कशीं राखावी, वडिल मंडळींचा मान कसा राखावा, आपली कामें आपण कशीं करावींत वगैरे गोष्टींची शिकवण लहानपणापासून दिली जात असते. शिस्त व स्वच्छता ह्या दोन गोष्टी तर मुलांना निर्धारानें पाळायला शिकवतात. मोठ्या मुलांच्या शाळांतून चित्र-

कला, हस्तकला, गायन, पियानो वादन, यांसारख्या कला मुलें लहानपणापासून हस्तगत करूं शकतात. चित्रकला शिकवण्याकडे खूप लक्ष पुरवलेलें आपल्या सहज लक्षांत येतें. कितीतरीं सार्वजनिक ठिकाणीं प्रायमरीशाळांचे व हायस्कूलचे वर्गच्या वर्ग नैसर्गिक देखावे, इमारती वगैरेंचीं चित्रें रेखाटण्यासाठीं बाहेर नेलेले आढळतात. तीच गोष्ट इतर विपयांची. शाळाकॉलेजमधून विद्यार्थ्यांचीं निरनिराळीं मंडळें असतात. सायन्स मंडळ, इंग्लिशमंडळ यां सारख्या मंडळांतून आठवडयांतून एक दिवस चर्चा चालतात. सहाजिकच या चर्चांतून भाग घेत राहिल्यानें मुलांचे ते ते विषय पक्के होतात. शाळा–कॉलेजच्या शेवटच्या मजल्यावरील प्रशस्त गच्चीवर त्यांच्याकडून सांघिक कवायत करून घेतली जाते. तसेच त्याच्यासाठीं खेळांचे क्लब्जहि असतात. नांझा युनिव्हर्सिटीची केवढीतरी अवाढव्य इमारत नागोयांत आहे. आपल्याकडे नुसते एस्. एस्. सी. झाल्यावर मुलांना कॉलेजमध्यें प्रवेश घेतां येतो. तिकडे विद्यार्थ्यांना पुन्हां कॉलेजची प्रवेश परीक्षा द्यावी लागते. त्यांत उत्तीर्ण झाल्यासच त्याला कॉलेजमधें प्रवेश मिळतो. त्यांच्याकडे साक्षरतेचें प्रमाण मात्र जास्ती आहे. त्यापैकीं एक कारण असें कीं मुलांचा मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणाच्या खर्चाचा पुष्कळसा भार सरकारच सोसते हें असावें.

**जशा** शाळा पाहयल्या तशाच कांहीं बागाहि पाहिल्या. मुंबईच्या राणीच्या बागेसारखो तिथली झुऑलॉजीकल गार्डन पहाताना तर वेळ कसा संपला तें कळलेंहि नाही. खूप मोठ्या विस्तृत जागेत निरनिराळे प्राणी पाहयला मिळाले. माकडाचे प्रकार, अस्वलाचे प्रकार, पक्षांचे प्रकार, सापांच्या जाती, कासवें सर्व कांहीं होतें. त्यातल्या पांढऱ्या अस्वलांसाठीं रहाण्याची जागा दगडांत गुहा खोदून केली आहे. आणि आतून बाहेरून पांढऱ्या रंगाची बनवलीय, त्यामुळें सगळीकडे बर्फ पडल्याचा भास होता. पेंग्वीनपक्षांना सार्थीदार पुष्कळ आहेत असें वाटावें म्हणून त्याचे कांही पुतळेंहि बसवलेले दिसत होते. अतिशय कलात्मक रीतीनें सर्व मांडणी

केलेली दिसून येते. भारतानें भेट दिलेली हत्तीण पाहून तर माहेरचे कुणीतरी भेटल्याचा आनंद परदेशांतहि मनाला वाटला.

जी करमणूक प्राणीसंग्रहालय पहातांना वाटली, तीच बोटॅनिकल गार्डन पहातांनाहि वाटली. विविध तऱ्हेच्या फुलझाडांची, वेलींची, वृक्षांचीं वर्षानुवर्षे निगा घेऊन केलेली लागवड पाहून कौतुक वाटतें. तिथेंहि वडापिंपळाचीं झाडें पाहून मनाला आनंद वाटला. जपानच्या सौंदर्यांत भर टाकण्याचें काम निसर्गातली तीन प्रकारचीं झाडें करतात. ज्याला Cherry Blossom म्हणतात तीं साकुरा नांवाचीं फुलझाडें मार्च एप्रिलमधें फुलतात. जपानमधला हा वसंताचा बहर पहाण्यासाठीं जपानी लोक व परदेशी पाहुणे हौसेनें गर्दी करतात. दुसरी तुतुल्जीचीं फुलें जून जुलैत बहरतात. आणि एरवीं हिरवींगार असाणारीं मोमीजीचीं झाडें गळण्यापूर्वी पानापानांवर असा कांहीं लालचुटुक रंग धारण करतात, कीं सगळीकडच्या हिरव्यागार वनराजींतून मोमीजीचीं लाल झाडें कांहीं महिने लक्ष ओढून घेतात ! यांच्या जोडीला विविध प्रकारचीं फुलझाडें असतात तीं वेगळींच. कोणत्याहि घरांत तीन चार तरी फुलदाण्या विविध फुलांच्या आकर्षक रचनेनें नटून घरांतल्या शोभेंत भर टाकत असतात; आणि येणाऱ्या जाणाऱ्यांचें मन आनंदित करतात. फुलांच्या आकर्षक रचना कशा कराव्यात हें शिकवणारे जपानमधें अनेक वर्ग चालतात. आणि विवाहापूर्वी मुली त्या क्लासमधें जाऊन ती कला शास्त्रोक्तपणें शिकून घेतात.

**नागोयांत** पाहिलेल्या इतर स्थळांचे वर्णनाबरोबर मीं पाहिलेल्या काहीं कारखान्यांविषयीं थोडंफार सांगितल्याशिवाय रहावत नाहीं. एक कारखाना पाहिला तो म्हणजे ओकुमा मशीनरी वर्क्स (Okuma Machinery Works) होय. ज्या कारखान्यांत नागोयांतल्या मुक्कामांत जगन्नाथांनीं ज्ञानाची देवाण घेवाण केली तो हा कारखाना होय. या कारखान्यांत वापरण्यांत येणाऱ्या एकूण यंत्रांपैकीं फक्त १० टक्के मशीनरी परदेशांतून

आणलेली आहे. बाकीचीं सर्व मशीन्स स्वतःचे कारखान्यांत व स्वतःचे देशांत बनवलेल्यांपैकीं आहेत. याला म्हणावे देशाभिमान ! या कारखान्यांत मशीनशॉपमधल्या कामगाराला १०० रु. पासून ५०० रु. पर्यंत वेतन महिन्याला मिळतें. कामाच्या वेळा सकाळीं ८ ते संध्याकाळीं ४-४५ पर्यंत व यांतच ४५ मिनीटें जेवणाची सुट्टी देण्यांत येते.

**शिकाऊ** कामगार मुलांना शिकवण्याचें काम स्टाफमधील अनुभवी मंडळी करत असतात. अर्धा दिवस ही शिकाऊ मंडळी अनुभवाचें ज्ञान घेतात व अर्धा दिवस शाळेंत शिकतात. शिकाऊ कामगारांना एक, दोन, तीन रेघा असलेल्या टोप्या वापराव्या लागतात. जसजसें शिकून परिपूर्णता येत जाईल व चाचणींत लायक ठरत जाईल तशी टोपीवरची रेघ कमी होत जाते. सर्व कामगार काम करतांना ॲप्रनसारखा कोट घालतात. या कारखान्यांत जास्ती प्रमाणांत मशीनटूल्स (Machine Tools) बनवलीं जातात, व फार थोड्या प्रमाणांत टेक्स्टाइल मशिनरी बनवली जाते. या कारखान्यांत दहा टक्के स्त्रीकामगार आहेत. बारीक सारीक कामें, गियर्सचीं कामें, फिनिशिंग, पेंटिंग वगैरे कामें स्त्रिया करतात. कारखान्याच्या कामाच्या वेळांत सुरवातापासून ते कारखाना सुटेपर्यंत कामगारांचे बरोबरीनें सर्व अधिकारी येतात व जातात हें विशेष. कामगारासाठीं कामाचे तास वेगळे अन् अधिकाऱ्यांचे कामाचे तास वेगळे हा भेदभाव कुठेंही आढळत नाहीं. हा कारखाना खूप जुना आहे. जपानमधल्या कुठल्याहि कारखान्यांत गेलं तरी जिकडे तिकडे सैनिकी शिस्त पाह्यला मिळते. बराच काळ युद्धांत भाग घ्यावा लागल्यानें अधिकारी वर्ग केंव्हांना केंव्हां युद्धावर जाऊन आलेला असायचाच आणि त्यानें घरींदारीं शिस्त पेरून ठेवलेली असायची. त्याचा परिणाम कारखान्यांतल्या शिस्तबद्ध हालचाली दाखवतात.

**तोवा** स्पिनींग कंपनी हा दुसरा कारखाना पाहिला. तसं पाह्यला गेलं तर हा कारखाना अगदींच लहान. या कारखान्यांत फक्त स्पिनिंगचें काम चालतें. विणण्याचें, धागे धुण्याचे वगैरे कामें यांच्याच इतर शाखा-

केलेली दिसून येते. भारतानें भेट दिलेली हत्तीण पाहून तर माहेरचे कुणीतरी भेटल्याचा आनद परदेशांतहि मनाला वाटला.

जो करमणूक प्राणीसंग्रहालय पहातांना वाटली, तीच बोटॅनिकल गार्डन पहातांनाहि वाटली. विविध तऱ्हेच्या फुलझाडांची, वेलींची, वृक्षांचीं वर्षानुवर्षे निगा घेऊन केलेली लागवड पाहून कौतुक वाटतें. तिथेंहि वडापिंपळाचीं झाडें पाहून मनाला आनंद वाटला. जपानच्या सौंदर्यात भर टाकण्याचें काम निसर्गातली तीन प्रकारचीं झाडें करतात. ज्याला Cherry Blossom म्हणतात तीं साकुरा नांवाचीं फुलझाडें मार्च एप्रिलमधें फुलतात. जपानमधला हा वसंताचा बहर पहाण्यासाठीं जपानी लोक व परदेशी पाहुणे हौसेनें गर्दी करतात. दुसरी तुतुत्जीचीं फुलें जून जुलैत बहरतात. आणि एरवीं हिरवींगार असाणारीं मोमीजीची झाडें गळण्यापूर्वी पानापानांवर असा कांहीं लालचुटुक रंग धारण करतात, कीं सगळीकडच्या हिरव्यागार वनराजींतून मोमीजीचीं लाल झाडें कांहीं महिने लक्ष ओढून घेतात ! यांच्या जोडीला विविध प्रकारचीं फुलझाडें असतात तीं वेगळींच. कोणत्याहि घरांत तीन चार तरी फुलदाण्या विविध फुलांच्या आकर्षक रचनेनें नटून घरांतल्या शोभेंत भर टाकत असतात, आणि येणाऱ्या जाणाऱ्यांचें मन आनंदित करतात. फुलांच्या आकर्षक रचना कशा कराव्यात हें शिकवणारे जपानमधें अनेक वर्ग चालतात. आणि विवाहापूर्वी मुली त्या क्लासमधें जाऊन ती कला शास्त्रोक्तपणें शिकून घेतात.

**नागोयांत** पाहिलेल्या इतर स्थळांचे वर्णनाबरोबर मीं पाहिलेल्या काही कारखान्यांविषयीं थोडंफार सांगितल्याशिवाय रहावत नाहीं. एक कारखाना पाहिला तो म्हणजे ओकुमा मशीनरी वर्क्स (Okuma Machinery Works) होय. ज्या कारखान्यांत नागोयांतल्या मुक्कामांत जगन्नाथांनीं ज्ञानाची देवाण घेवाण केली तो हा कारखाना होय. या कारखान्यांत वापरण्यांत येणाऱ्या एकूण यंत्रांपैकीं फक्त १० टक्के मशीनरी परदेशांतून

आणलेली आहे. बाकीची सर्व मशीन्स स्वत:चे कारखान्यांत व स्वत:चे देशांत बनवलेल्यांपैकीं आहेत. याला म्हणावे देशाभिमान ! या कारखान्यांत मशीनशॉपमधल्या कामगाराला १०० रु. पासून ५०० रु. पर्यंत वेतन महिन्याला मिळतें. कामाच्या वेळा सकाळीं ८ ते संध्याकाळीं ४-४५ पर्यंत व यांतच ४५ मिनीटें जेवणाची सुट्टी देण्यांत येते.

शिकाऊ कामगार मुलांना शिकवण्याचें काम स्टाफमधील अनुभवी मंडळी करत असतात. अर्धा दिवस ही शिकाऊ मंडळी अनुभवाचें ज्ञान घेतात व अर्धा दिवस शाळेंत शिकतात. शिकाऊ कामगारांना एक, दोन, तीन रेघा असलेल्या टोप्या वापराव्या लागतात. जसजसें शिकून परिपूर्णता येत जाईल व चाचणींत लायक ठरत जाईल तशी टोपीवरची रेघ कमी होत जाते. सर्व कामगार काम करतांना ॲप्रनसारखा कोट घालतात. या कारखान्यांत जास्ती प्रमाणांत मशीनटूल्स (Machine Tools) बनवलीं जातात, व फार थोड्या प्रमाणांत टेकस्टाइल मशिनरी बनवली जाते. या कारखान्यांत दहा टक्के स्त्रीकामगार आहेत. बारीक सारीक कामें, गियर्सचीं कामें, फिनिशिंग, पेंटिंग वगैरे कामें स्त्रिया करतात. कारखान्याच्या कामाच्या वेळांत सुरवातीपासून ते कारखाना सुटेपर्यंत कामगारांचे बरोबरीनें सर्व अधिकारी येतात व जातात हें विशेष. कामगारासाठीं कामाचे तास वेगळे अन् अधिकाऱ्यांचे कामाचे तास वेगळे हा भेदभाव कुठेंही आढळत नाहीं. हा कारखाना खूप जुना आहे. जपानमधल्या कुठल्याहि कारखान्यांत गेलं तरी जिकडे तिकडे सैनिकी शिस्त पाह्यला मिळते. बराच काळ युद्धांत भाग घ्यावा लागल्यानें अधिकारी वर्ग केंव्हांना केंव्हां युद्धावर जाऊन आलेला असायचाच आणि त्यानें घरींदारी शिस्त पेरून ठेवलेली असायची. त्याचा परिणाम कारखान्यांतल्या शिस्तबद्ध हालचाली दाखवतात.

तोवा स्पिनींग कंपनी हा दुसरा कारखाना पाहिला. तसं पाह्यला गेलं तर हा कारखाना अगदींच लहान. या कारखान्यांत फक्त स्पिनिंगचें काम चालतें. विणण्याचें, धागे धुण्याचे वगैरे कामें यांच्याच इतर शाखा-

कारखान्यांत चालतात. या कारखान्यांत Mohair Yarn, किंवा लोंकर व सूत यांच्या मिश्रणापासून धागे तयार करतात. प्रथम वेगवेगळ्या धाग्यांचे गुडे केले जातात आणि नंतर हे धागे एकत्र गुंडाळले जातात. दोनशें दोनशें बॉबीनचें मशीन फक्त एकच स्त्री पहात असतें. धाग्यांवर हवेचा परिणाम होऊं नये म्हणून हा हॉल एअर कंडिशन्ड आहे. इथें तयार झालेली बंडल्स दुसऱ्या एका हॉलमधें नेण्यांत येतात. इथल्या स्त्रिया धाग्यांचीं बंडल्स तपासतात व त्यांतले तुटके धागे काढून टाकतात. नंतर हीं बंडल्स पॅकिंग करून कारखान्याबाहेर जातात. या कारखान्यांत प्रत्येक स्त्रीकामगाराला साधारणपणें ५००० येन म्हणजे ६५ ते ६७ रुपये महिन्याला मिळतात. अनुभवी स्त्रियांना मात्र दुप्पट पगार मिळतो. त्यांतली कांहीं रक्कम कामगाराना जेवणाचे रूपानें दिली जाते. कारखान्याशेजारी स्त्रीकामगारांसाठीं वसतिगृह बांधलेलें आहे.


**त्यानंतर** पाहिलेला कारखाना म्हणजे तोयोदा कंपनी होय. श्री. किच्रो तोयोदा यांनी अतिशय श्रम घेऊन या कारखान्याची सुरवात केली. हळूहळू वाढतां वाढतां आज या कारखान्याचा पसारा खूपच मोठा झाला आहे. एकंदर कारखाना जवळ जवळ पाचशें एकर जागेवर वसला असून त्यात ५ ते ६ हजार कामगार काम करीत आहेत. या कारखान्यांतून मोठें ट्रक, Toyopit Crown नांवाच्या छोट्या मोटारी व Toyoda Land Cruiser अशा मोटारी तयार होतात. कौतुकाची गोष्ट म्हणजे जपानमधे जितक्या मोटारी निर्माण होतात तेवढ्या जपानच्याच बाजारांत (Home Market) कमी पडतात. हा कारखाना पहातांना मन अगदीं थक्क होतें. क्रेनच्या सहाय्यानें व मशीनच्या सहाय्यानें, निरनिराळ्या विभागांतून मोटारीचे सुटे भाग एकत्र जमवले जातात व त्यांची जोडणी केली जाते. दोन ते अडीच तास सर्व विभाग हिंडल्यांवर संपूर्ण मोटार कशी कशी तयार होते तें पाह्यला सापडतें. या टोंकापासून त्या टोंकापर्यंत कितीतरी हिंडून



'सुस्वागतम', नागोया. (पान २५)
(KANKO HOTEL)



"देवाचिये द्वारीं" कामोझाकी (पान ३८)



" नदीकिनारी " – गिफू
( पान ४० )



" मच्छीमारी " – गिफू
( पान ४० )

पाहिलें, पण कुठेंहि कामगार एकमेकांशीं बोलत नाहींत, कीं आपलें काम करणें सोडत नाहींत !

**त्यानंतर** आणखी एक मोठी कंपनी पाहिली. त्या कंपनीचें नांव आजकाल वर्तमानपत्रांतील जाहिरातींतून येत असल्यानें आमच्या परिचयाचें होतें. Mitsubishi (मित्सुबिशी) या कंपनीचे कारखाने नागोयाबाहेर जवळपास पण वेगवेगळे असे विभागलेले आहेत. ते म्हणजे इवात्स्का फॅक्टरी, दायको फॅक्टरी व ओये फॅक्टरी हे होत. पण हे तिन्ही कारखाने वैशिष्टयानें वेगवेगळे आहेत. त्यांपैकीं इवात्स्कामधें टेक्स्टाईल मशीनरी बनवली जाते. ओये फॅक्टरीमधें स्कूटर, जीप, बस बॉडीज वगैरे बनवल्या जातात. युद्धकाळीं बॉम्बवर्षावांत हे सर्व कारखाने जवळजवळ जमीनदोस्त झाले होते. त्यांची उभारणी पुनः करण्यांत मधें थोडा अवधी गेलाच. आम्ही गेलों होतों त्या कारखान्यांत छोटया ड्रिलिंग मशीनवर स्त्रिया काम करीत होत्या. फक्त पांच टक्केच स्त्रीकामगार आहेत असें कळलें. या कारखान्यांतून चार प्रकारचे स्कूटर बनवतात. महिन्याला तीन हजार सेट बाहेर पडतात. दायको फॅक्टरींत विमानाच्या भागांची बांधणी व जुळवणी केली जाते. या कारखान्यांतले कांहीं विभाग मात्र कुणाही परकी लोकांना पाहूला मिळत नाहींत.

**कारखान्यांतून** हिंडतांना एक गोष्ट चट्टदिशीं नजरेंत भरते; ती म्हणजे शिस्त होय. कामाला सुरवात केल्यापासून कामगार अगदीं मन लावून कामांत मग्न असतात. जेवणाचे सुट्टीचे वेळीं मात्र एकमेकांची चेष्टा-मस्करी, गप्पा चालतात, पण एरवी आपण बरें, की आपलें काम बरें ! कांहीं विभागांतून कामगारांसाठीं सूचनाफलक लावलेले असतात.

*'Quality must be built into product. The Product cannot be inspected into it.'*

कारखान्यांतील किरकोळ कामें, प्यूनचीं कामें, चहा वगैरे पोंचवण्याचीं कामें स्त्रिया करतात. त्याचप्रमाणें ऑफिसमधून जास्ती स्त्रिया काम करतांना आढळतात. ज्या ज्या ठिकाणीं कलाकुसरीची नाजूक कामें चालतात तिथें स्त्रियांचे नाजूक हात कामांत गुंतलेले दिसतात. टेक्सटाईल मिल्समधून सर्वांत अधिक स्त्रिया काम करतांना दिसून येतात. दुकानांतून, हॉटेल्समधून, डिपार्टमेंट स्टोअर्समधून, खानावळींतून, लिफ्ट चालवतांना स्त्रिया दिसतात. थोडक्यांत म्हणजे आमच्या जपानी भगिनी प्रत्येक कार्यक्षेत्रांत पुरुषांचे बरोबरीनें आघाडीवर आहेत असं म्हणायला हरकत नाहीं !

**मेच्या** १२ ता. ला **नागोयाहून** परत निघायचें होतें. तिथल्या मुक्कामांतलें जगन्नाथांचें काम त्यांनीं ठराविक मुदतींत संपवलें होतें. त्या दिवशीं सकाळपासून सर्व सामानाची आवराआवर केली. कान्फो हॉटेलमधल्या आमच्या खोलींतला संसार आवरला, बॅगा भरण्याचें काम उरकलें. थोड्या दिवसाचे वास्तव्यांत नागोया शहर बरेच परिचयाचें झालें होतें. बऱ्याच वेळां त्याच त्याच रस्त्यावरून जा ये केल्यानें कांहीं ठिकाणीं गाईडचे सोबतीशिवाय एकटी हिंडून येईन इतका आत्मविश्वास निर्माण झाला होता. नागोया सोडण्याचा विचार मनाला जड वाटत होता. दुपारीं २ च्या सुमाराला महत्त्वाचीं कागदपत्रें जुळवून, बिलें चुकतीं केलीं, आणि चहा घेऊन नागोया स्टेशनवर आलों. नागोया स्टेशनवर उतरलों तेव्हां स्वागताला फक्त तीन-चार माणसेंच आलीं होतीं; पण पंधरा दिवसांच्या सहवासांत झालेली मैत्री, नव्या ओळखी, नवे मित्र यांमुळें निरोप द्यायला स्टेशनवर बरीच मंडळीं आलीं होती. श्री. ओकुमांना महत्त्वाची मीटिंग असल्यानें ते स्टेशनवर येऊं शकणार नव्हते, म्हणून ते सकाळींच हॉटेलमधें येऊन भेटून निरोप घेऊन गेले होते. मिसेस ओकुमा मात्र उन्हाची वेळ असूनही स्टेशनवर आल्या होत्या. आम्ही बरेच वेळां एकमेकींना भेटलों होतों, बरोबरीनें फिरलों होतों, जेवलों होतों आणि आतां एकमेकींपासून दूर होणार होतों.

**जों जों** गाडीची वेळ होऊं लागली, तों तों पोटांत कालवाकालव होऊं लागली. खूप बोलावंसं वाटत होतं, आणि काय बोलावं तें सुचत नव्हतें. तेवढ्यांत आमची ताटातूट करणारी गाडी आली. आम्हां दोघांचेहि डोळे भरून आले होते. इतर माणसें सामान वगैरे ठेवताहेत तोंवर त्या आम्हां दोघांनाहि म्हणाल्या, 'जपून जा आणि पत्र पाठवा हं !' मीहि त्यांना म्हटलं, 'आतां श्री. ओकुमा येतील तेव्हां तुम्हींहि माझ्या भारतांत आलं पाहिजे हं !' वेळ थोडा राहिला म्हणून आम्ही दोघे गाडींत चढून खिडकीशीं बसलों. निरोपाचा हात दाखवीपर्यंत गाडी हाललीसुद्धां ! आणि मग मात्र मी माझ्या पाझरणाऱ्या डोळ्यांना आवरूं शकले नाहीं. एवढ्या थोड्या अवधींत त्या प्रेमळ मंडळींचा इतका लळा लागला असेल याची कल्पनाहि नव्हती.

**गाडीनें** टोकियोकडे जायला सुरवात केली होती. खिडकी बाहेरचें प्रत्येक दृश्य मी डोळयांत सांठवून घेत होतें. हें सर्व पुन्हां कांहीं पाह्यला मिळण्याची शक्यताहि नव्हती अन् कारणहि नव्हतें. **नागोयाला** जातांना हीं सर्व शेतें हिरवीगार होतीं. मोहरी फुलांवर आल्यानें पिवळेजर्द गालिचे दूरवर अंथरलेले पाहिले होते आणि आतां त्याच शेतांतून मोहरीच्या हिरवटसर जांभळटसर शेंगांमुळें शेतांचा कायापालट झाला होता. गव्हाचीं शेतेंहि बरीचशीं पिवळीं झालीं होतीं. कापणीला कधीं सुरवात होतीय याची वाट पहात दाण्यांचा भार शिरावर घेऊन रोपें वाऱ्यावर मंदपणें डुलत होतीं. कुठल्याहि स्टेशनवर गाडी थांबली तरी तें आतां ओळखीचें वाटत होतें. बाहेर अंधार झाल्यावर मात्र निसर्गांतलीं दृश्यें पहाणें साधेना. पण सगळीकडेच विजेच्या दिव्यांचा लखलखाट व नाना प्रकारच्या जाहिराती पहाण्यांत वेळ कसा लौकर निघून चालला होता तें कळतहि नव्हतें !

**रात्रीं** आम्ही **टोकियो** स्टेशवर उतरलों. एका रात्रीपुरती आमची सोय दायची (Dai–ichi) हॉटेलमधें केली होती या हॉटेलच्या आठव्या

मजल्यावर आमची खोली होती. म्हणजे ती तळमजल्यावरून शेवटपर्यंत आपोआप जात होती व उतरत होती. पण कशी ? तर प्रत्येक मजल्यावर कांहीं सेकंद थांबे, दरवाजा उघडला जाई, तेवढ्या वेळात माणसें त्यांत शिरत वा बाहेर येत, लगेच दरवाजा बंद होई. मग पुढच्या मजल्यावर चढत असे. ही सर्व कसरत वीजेच्या सहाय्यानें आपोआप होत रहावी अशी तिची रचना होती. आमच्या खोलीतून रस्त्यावरचें दृश्य फारच आकर्षक दिसत होतें. या हॉटेलमधें चारपांच दिवस राहूयला मिळावं असं वाटत होतं, पण तें शक्य नव्हतं ! कारण दोन तीन दिवसांतच टोकियोंत International Sports सुरू होणार होते. त्यांत भाग घेण्यासाठीं येणाऱ्या बऱ्याच खेळाडूंची रहाण्याची सोय या हॉटेलमधें केली होती. तें संपूर्ण हॉटेल तेवढ्यामुदतीमाठीं रिझर्व केलें होतें. सहाजिकच दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही Hotel Tokyo मधें राहूयला गेलों. सकाळीं तिथल्या गींझा स्ट्रीटवर जरा हिंडून आलों. येतांना एका इंडियन हॉटेलमधें जेवण घेतलें. श्री. नायर यांचें हें हॉटेल आहे. ते स्वत: जातीनें लक्ष देऊन भारतीय पाहुण्यांच्या जेवण्याची भारतीय पद्धतीनें व्यवस्था करतात. या हॉटेलमधें भारतीय मंडळी भेटली. जेवण झाल्यानंतर खोलीवर गेलों, व एक छोटी बॅग एक दिवसापुरती तयार करून घेतली. ठरल्यावेळीं जगन्नाथांचे जपानी मित्र आले व आम्ही सर्वच जण **येनो** Ueno स्टेशनवर आलों.

**येनो** ते नागाओका हा जवळ जवळ चार तासांचा प्रवास आहे. पण तो आजिबात कंटाळवाणा वाटला नाहीं. साधारणपणें तास दीड तास प्रवास झाल्यावर समोर दूरवर डोंगराच्या शिखरावर कांहींतरी पांढरें पसरलेलें दिसत होतें खरं म्हणजे तो डोंगर खूप लांब होता. काय आहे तें नीट दिसत नसल्यानें आमचे आपले दोघांचें तर्कच चालले होते. पण गाडी जसजशी डोंगराजवळून जाऊ लागली तेव्हां तें पांढरें ठिकठिकाणीं असलेलें दिसू लागलें व काय आहे त्याचा उलगडाहि झाला. तें पांढरं म्हणजे दुसरं तिसरं कांहीं नसून बर्फ होतं ! ती मजेदार दृश्यें पहात प्रवास फारच लौकर

संपला. संध्याकाळच्या सुमाराला आम्ही नागाओकाला पोचलों. नागाओकांत पाश्चिमात्य पद्धतीचें चांगलें हॉटेल नसल्यानें (त्या लोकांच्यामतें) त्यांनीं सर्वांचीच उतरण्याची सोय एका जपानी हॉटेलांत केली होती. त्यामुळें नवा अनुभव, पण तोहि बरा वाटला. जमिनीवर बसून चौरंगासारख्या उंच टेबलावर जेवणें, पायांत न घालतां, किंवा सपाता घालून वावरणें, जमिनीवर गाद्या घालून झोपणें, आंतून कड्या नसलेल्या संडास-बाथरुमचा वापर करणें अशा कांहीं संवयीच्या व नवख्या अनुभवांची भेसळ झाली होती.

**रात्रीं** जेवल्यानंतर खाजगी नृत्याचा कार्यक्रम थोडावेळ पाहून आलों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहा व खाणें झाल्यावर सामानासकट हॉटेल सोडलें. त्सुगामी कंपनीचा कारखाना पाहयला गेलों. वास्तविक हा कारखाना खूप मोठा आहे. पण मालाला मागणी कमी असल्यानें कांहीं खाती बंद ठवली होतीं. इंजीयनिअर्स लोकांना लागणारीं मोजमापाचीं बरींच अवजारें या कारखान्यांत तयार होतात. तशीच शिवणाचीं यंत्रेंहि इथें बनवलीं जातात. जवळजवळ २/२॥ तास हिंडून हा कारखाना पाहिला. १२ चे सुमाराला त्यांनीं कारखान्यांतच सर्वांची जेवणाची सोय केली होती. परत येताना त्यांच्या कारखान्यांतली तीन चार मंडळी आमच्या बरोबर टोकियोपर्यंत होतीं, त्यामुळें परतीचा प्रवास गप्पा मारत झाला. संध्याकाळीं आम्हाला हॉटेल टोकियोंत सोडून ती मंडळी निघून गेली. दुसऱ्या दिवशी कार्यक्रम असा कांहीं नव्हता. शिवाय जगन्नाथाना टोकियो आफिसमधली कामें होतींच. मीं त्या दिवशीं श्री कवाशिमांना बरोबर घेऊन खरेदी केली. कारण ही खरेदी परत येतांना करायची असें आम्ही ठरवलें होतें.

**जपान** खेळण्यांसाठीं प्रसिद्ध आहे मी मात्र जपानमधील प्रवासाची स्मृति म्हणून छोटीं छोटीं खेळणीं घेतलीं. **अरुणसाठीं** बॅटरीवर चालणारी पोलिसकार आणि जपानी वेशभूषा केलेली एक भावली घेतली. माझी खरेदी पाहून श्री. कवाशिमा म्हणालेसुद्धां कीं इतर परदेशी पाहुणे पुष्कळ

वस्तू घेऊन जातात. तुम्ही फक्त एवढच घेतलंत ? पण त्यांना काय माहिती कीं, मी व जगन्नाथ यांच्यांत दरम्यान कांहींहि खरेदी न करण्याचा करार झाला होता व मी तो एकदम मान्य केला होता ! नुसतें विमानाचें जाण्यायेण्याचें भाडें हीच रक्कम हजारोंवारी होती. एकाच महिन्यासाठीं एवढी मोठी रक्कम खर्चून त्यांनीं मला बरोबर चल म्हटलं होतं याचाच मला मनापासून आनंद झाला होता. शिवाय जपानी वस्तू काय मी भारतांतहि खरेदी करूं शकलें नसतें कां ? जपान देश मात्र भारत सोडल्याखेरीज मला पाहतां आला नसता ! नुसता जपान पाह्यला मिळाला हीच माझ्या दृष्टीनें मौल्यवान घटना घडली होती. असं मी कां म्हणते याची कल्पना उठपळ पर-देशीं जाऊ शकणाऱ्यांना कदाचित् येणार नाहीं; पण माझ्यासारखी मध्यम-वर्गांतली स्त्री, जिला प्रपंच्यांतल्या कितीतरी हौशीमौजा केवळ खर्चानें झेपत नाहीत म्हणून मनांत ठेवाव्या लागतात, तिला हट्ट न करतां पतीनें स्वखुषीनें खर्च करून परदेश पाह्यला बरोबर चल म्हणावें नी जपानसारखा सुंदर देश दाखवावा या आनंदाला मौल्यवान नाही म्हणायचं तर काय ?

निक्को—

**मेच्या** सोळा तारखेला सकाळीं मी, जगन्नाथ व श्री. कवाशिमा निक्को हें प्रसिद्ध शहर पाह्यला निघालों. जाताना आम्ही आमचे शाकाहारी सँडवीच बरोबर घेतले होते, कारण हिंडण्यापुढें जेवणाला सावकाशीनें वेळ मिळण्याची शक्यता फार थोडी होती. सकाळीं ८–२०ची निक्कोलाच जाणारी खास डिझल एक्स्प्रेस आम्ही पकडली व प्रवासाला सुरवात झाली. ही गाडी सुरूं झाल्यापासून मधें कुठेंहि थांबली नाहीं. फक्त एक स्टेशनवर थांवून थेट निक्कोला पोहोंचली.

**निक्कोला** पोंचल्यावर आम्ही भाड्याची टॅक्सी केली व निक्को पाह्यला निघालों. पहिल्यांदा धबधबे पाह्यला जायचें ठरलें. धबधबे पाह्यला म्हणून ज्या रस्त्याने उंचीवर जावें लागतें त्या रस्त्याची बांधणी

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
०२२२



मोठी कलात्मक असून तो रस्ता प्रेक्षणीय वाटतो. हा रस्ता वरपर्यंत एकूण ४४ वळणांचा आहे. हिरव्यागोर डोंगरांतून रस्त्याची वळणदार पट्टी फारच सुंदर दिसते. जिथे पहिलें वळण सुरु होतें त्याच्या समोर ठराविक अंतरावर वळून मोटर थोडचा उंचीवर जाते. पण त्यानंतरच्या उंचीवर जाण्यासाठीं ती जिथें वळते तें वळण पहिल्याच्याच वर आलेलें असतें. प्रत्येक वळणापाशीं भींतींत तीनतीन लाल दिव्यासारखं काहीसं बसवलेलं होतं. मोटारीच्या दिव्याचा प्रकाश त्यावर पडला की लगेच ड्रायव्हरला तिथें वळण आहे, याची सूचना मिळते. जों जों वर जावें तों तों धुकें दाट बनत जातें, दहा हातावरील वस्तू दिसेनाशी होतें. पण तशा दाट धुक्यांतूनहि सराईत ड्रायव्हर्स टॅक्सी, गाडचा, बसेस् सुखरूपपणें वरपर्यंत नेतात आणि उतरवतात. धबधब्याचें मनोहर दृश्य पहाण्यासाठीं जवळजवळ चार हजार फुट उंचीवर आम्ही पोंचलों होतों. केगॉन (Kegon Waterfall) धबधबा हा या भागांतील सर्वांत मोठी धबधबा आहे. केवढा तरी पांढरा सफेद प्रवाह उंचावरून कोसळत असतो. त्या धबधब्याचा अखंड आवाज वातावरणांत घुमत असतो. भोंवतालीं सगळीकडे नयनरम्य हिरवीगार झाडी व फुलझाडें सौंदर्यांत भर टाकीत असतात.

छुझेनजी तलावाभोंवती (Lake Chuzenji) असणारें नैसर्गिक सौंदर्य अप्रतीम आहे. कितीहि पाहिलें तरी समाधान होत नाहीं. तलावाभोंवतीं रंगीबेरंगी वनराजी व विविधरंगीं फुलें बाराहि महिने तलावाभोंवती असणारें वातावरण आल्हाददायक करत असतात. या सौंदर्यस्थळाचा आनंद घेण्यासाठीं इथें नेहमी जपानमधले व परदेशी लोक आवर्जून येतात. मोटारीनें चढली जाणारी चढण चढण्याचा दुसराहि मार्ग इथें आहे. तो म्हणजे (Rope Way) होय. पर्वताच्या पायथ्यापासून शिखरावर याहि मार्गानें आम्हाला जातां आलें असतें; पण बघण्यासारखीं मार्गावरील इतर सौंदर्यस्थळें पाहयला मिळालीं नसतीं. विजेच्या सहाय्यानें

चढणाऱ्या व उतरणाऱ्या छोटया गाड्या पहायला फार गंमत वाटते. चार तास त्या वातावरणांत थांबूनहि निघतांना पाय जड झाले होते.

तिथून उतरून आल्यावर (Yomei–Mon–Gate) नांवाची इमारत पाहिली. जपानमधलीं ही एक जुनी व प्रसिद्ध इमारत फारच सुंदर आहे. प्रवेशद्वारावरील लांकडांतील कोरीव काम, त्यांत केलेलें रंगकाम फारच सुंदर आहे. कुठें कोरलेलीं तीन माकडें दिसतात, तर कुठें झोपाळू मांजर आहे. दाराशींच केवढाले तरी मोठे द्वारपाल आहेत. सगळीकडे लांकडांतील कोरीव काम व रंगकाम विशेषत: काळा अन् सोनेरी रंग अतिशय वैशिष्टयानें चमकत असतो. रंगकामांतून इतकी विविधता अन् ताजेपणा आहे, कीं त्यातलें रंग जराहि कुठें फिके वाटत नाहीत. पहातांना असं वाटतं कीं नुकतेच कुठें चित्रकार रंग भरून दूर झाले असावेत. या सुंदर इमारतीला पार्श्वभूमीहि हिरव्यागार झाडींचा आहे.

एक पॅगोडाहि जवळून पाहून घेतला. याची उंची जवळजवळ १०० ते ११० फूट असून हा पांच मजल्याचा आहे. हा पॅगोडा प्रसिद्ध बुद्ध कालीन इमारत म्हणून मानला जातो. ज्याप्रमाणें बुद्धाच्या पॅगोडामधें कलेचे नमुने पाह्यला मिळतात, तशाच सुंदर कला तोकु गांवच्या स्मरणार्थ बांधलेल्या सर्व इमारतींमधून पाह्यला मिळते. या इमारतीमधील कोरीव काम व बांधणी जगप्रसिद्ध आहे. अगदी एका दिवसात धांवत पळत पाह्यचें ठरवलें तरी त्या शहरांतील सौंदर्यस्थळें मनांत ठसतात. जपानी लोकांची आवडती म्हण आहे कीं, " Never say magnificent until you have seen Nikko" असें सौंदर्यपूर्ण निक्को शहर पाहून रात्री साडेआठनंतर टोकियोला आम्ही परत आलों.

दुसरा दिवस उगवला. ती मेची १७ तारीख होती. मनाला भारतांत परत जाण्याची ओढ टोकियोंत परत आल्यापासून लागली होती हें

जरी खरें तरी पण निघण्याचा दिवस उगवल्यानंतर जाण्याचा विचारहि मनाला जाणवूं लागला. असं वाटलं कुणी आग्रह केला तर आणखीन् चार आठ दिवस राहावें इथें ! पण कुणी कितीहि आग्रह केला असता तरी निघायचें नक्कीच होतें. सबंध दिवस हात सामान आवरत असले किंवा कामांत असले तरी मन मात्र जड बनलें होतें. त्यादिवशीं भेटायला येणारी मित्रमंडळी विषण्ण चेहेऱ्यानें येत होती व निरोप देत होती, भेटी-दाखल वस्तूहि देत होती. वियोगाची कल्पना मनाला असह्य भासत होती. रात्रीचें जेवण आम्ही तिघाचौघांनीं एकत्रच घेतलें. बिलें वगैरे चुकतीं केलीं व रात्रीं १०॥ च्या सुमाराला सर्व सामानासह व महत्त्वाच्या कागद-पत्रासह आम्ही विमानतळावर आलों.

कितीहि गप्पा मारल्या तरी अजून कांही तरी विचारावंसं, सांगावंसं वाटत होतं. ११॥ नंतर प्रवाशांना कस्टममधलें बोलावणें आलें. आतां मात्र अगदीं निघायलाच हवं होतं ! आम्ही दोघांनीं अखेरचा निरोप घेतला व जड पावलानें कस्टम विभागाकडे कूच केलें. तिथल्या सर्व जुजबी तपासण्या पार पडल्या. टोकियोंत उतरलों तेव्हां संपूर्ण वातावरण नवखें असल्यानें मनांत भीतियुक्त काळजी होती. आणि आतां निघतांना ? महिन्यांतील सहवासानें माणसांचा परिचय झाला होता. जुनी मैत्री दृढ झाली होती. त्या भूमीविषयीं जिव्हाळा उत्पन्न झाला होता. श्री. कवाशिमा व इतर मंडळींना निरोप देते वेळीं याच भावनेनें मन जड झालें होतें. अतिशय अगत्यशील व प्रेमळ लोकांपासून दूर जायचें, मनाला त्रासदायक वाटत होतें. पावणेबाराच्या सुमाराला प्रवाशांना विमानांत जाऊन बसण्याची सूचना मिळाली. विमानांत चढण्यासाठीं शिडीवर पाय ठेवतांना जपानच्या भूमीचा सहवाससंबंध संपल्याप्रमाणं वाटलं. मायदेशाची ओढ आंतून तीव्र असली तरी जपानी सुहृदांच्या वियोगाचें दुःख डोळे भरून आणीत होतें.

आम्ही आमच्या नियोजित जागेवर जाऊन बसलों. हवाई सुंद-रींनीं आमचें स्वागत केलें. विमान सुरूं होतांना आम्हा सर्व प्रवाशांना

खिडकीबाहेर पहाण्याची प्रेमळ सूचना दिली. सूचना वाचण्यापूर्वीच आम्ही पट्टे बांधून तयार होतों. विमानाचे पंखे सुरूं झाले व दिशा घेऊन तें जमिनीपासून हळूंच वर उचललें जाऊं लागलें. विमानांतले सर्व दिवे मुद्दाम मालवले होते. विमानांतहि अंधार अन् बाहेरहि अंधारच ! वैमानिकानें थोड्या उंचीवरून संपूर्ण टोकियो शहराला एक प्रदक्षिणा घातली. विमानांत अंधार असल्यानें टोकियोचें दर्शन स्पष्टपणें होत होतें. दिवसा माणसांनीं व वाहनांनीं गजबजलेलें टोकियो शहर त्यावेळीं विश्रांती घेत होतें. रात्रीच्या वेळी फक्त विजेच्या चमकत्या दिव्यांची गर्दी तेवढीच टोकियोंत दिसत होती. नाना रंगाच्या दिव्यांतल्या अनेकविध जाहिराती, रस्त्याकडेच्या दिव्याच्या रांगा, कुठें डोळे चमकावल्यागत उघडझाप करणाऱ्या जाहिराती हें सर्व दिवाळीच्या रोषणाईसारखें आकर्षक दिसत होतें.

**आपल्याकडे** कारणप्रसंगानें होणारी विजेच्या दिव्यांची रोषणाई तिथें रोजच रात्रीं चालू असते याची कल्पना त्या फेरीनें आणून दिली. काय पहावें न् काय नाहीं असें होऊन गेलें, पण तोंपर्यंत विमान जास्ती उंचीवर गेलें होतें. तें अतिशय सुंदर दृश्य पोटभर पाहून डोळ्यांतून निसटून जाऊ नये म्हणून मी डोळे मिटून घेतले, आणि तें दृश्य मनावर कोरून ठेवण्याचा प्रयत्न केला. एअर इंडिया इंटर नॅशनलची ‘ अयोध्येची राणी ’ आम्हाला जपानपासून आमच्या मायदेशाकडे घेऊन चालली होती. पण मनांत मात्र जपानच्याच विचारांची बेसुमार गर्दी झाली होती !

**आकारानें** अतिशय लहान आणि लोकवस्तीनें जपान हा देश केवढा गजबजलेला ! पण प्रत्येक क्षेत्रांत आघाडीवर आढळला. ठोकळ मानानें जपानी लोक तीन प्रकारच्या कार्यक्षेत्रांत गुंतलेले असतात. शेती, मच्छी-मारी व कारखानदारी. तिसऱ्या क्षेत्रांत म्हणजे कारखानदारींत तर फारच झपाट्यानें वाढ झालेली आहे. या लोकांचें बालपणापासून सर्व जीवन कसें अगदीं शिस्तबद्ध आहे ! शाळेचा विद्यार्थी म्हटला कीं, भांगहि पडणार

नाहीं इतके थोडे केस डोक्यावर, संपूर्ण राष्ट्रीय वेष, त्यामुळें तो कुठल्याहि भागांत दिसला तरी तो शालेय विद्यार्थी आहे हें चटकन् ओळखतां येतें. दिर्घोद्योगाचें, चांगलें काम करण्याचें तर जणूं काय प्रत्येकाला बाळकडूच पाजलेलें असतें.

**शिस्तीच्या** बरोबरीनें दुसरा गुण नजरेंत भरतो तो म्हणजे स्वच्छता हा होय. घर असो कारखाना असो, ऑफिस असो, स्टेशन असो, गाडी असो, की देऊळ असो. सगळीकडे कसं अगदीं स्वच्छ असतं ! कुठें म्हणून धूळ वा कचरा दिसणार नाहीं ! घराभोंवतीं आकर्षक बाग असतेच. रंगीगेरंगी फुलें वाऱ्यावर डुलून डुलून वातावरणांत आनंद भरतात. जी गोष्ट फुलांची तीच गोष्ट मुलामाणसांची ! सदैव हंसतमुख ! प्रत्येकजण आपल्या वाट्याला आलेलें काम अगदीं आनंदानें व उत्साहानें पार पाडण्यांत मग्न दिसतो ! कंटाळा हा शब्द त्यांच्या परिचयाचा नसावा असें वाटतें ! सगळीं माणसें कशीं अगदीं अगत्यशील ! प्रत्येकजण देशाभिमामानें भारलेला. साध्या बोलण्यांतहि (कारखान्याचा कामगार असला तरी) म्हणेल 'माझ्या कारखान्यांत अमूक एक होतं. माझा कारखाना, माझा देश, माझें घर, माझीं माणसें, हें जें '**माझेंपण**' बोलण्यांतूनहि व्यक्त होतं त्यांतच त्या मागची भावना स्पष्ट दिसून येते. सदैव युद्धाचें चटके बसूनहि आपल्या कार्यतत्परतेनें व चिकाटीमुळें आज जपाननें जगाच्या नाणे बाजारांत मानाचे स्थान मिळवलें आहे. औद्योगिक क्षेत्रांतील या देशाची प्रगति तर अतिशयच कौतुकास्पद आहे. प्रत्येक वस्तूचे बाबतींत त्यांचें स्वावलंबी बनण्याचे प्रयत्न कसून चालू आहेत !

**ज्या दिवशीं** प्रथम टोकियोंत उतरलों त्या दिवशीं आमची दोघांचींहि मनें भीतीनें व शंकाकुशंकांनीं भरलीं होतीं. काय वागणूक मिळेल, कसे दिवस जातील, भाषा समजत नाहीं म्हणून कितपत हाल होतील, अशा अनेक शंका मनांत येत होत्या. पण प्रत्यक्षांत अनुभव मात्र फारच चांगला मिळाला. परत

38269 भ. सवारा

जातांना कितीतरी सुंदर स्मृतिसुमनांची सुगंधीमाळ घेऊन आम्ही परतत होतों. एका महिन्याच्या मुक्कामांत हजारो मैलांच्या अंतराचें असणारें दूरत्व नष्ट झालें होतें.कुणीतरीं आपलींच नात्याचीं माणसें जपानमध्यें असावींत इतकी आपुलकी निर्माण झाली होती आपल्या माणसांच्या कर्तबगारीच्या कौतुकानें जसें मन भरून येतें, तसेच तोयोदा, मित्सुबिशी कारखान्यांचे विचार मनांत येताच झाले.या दोन्हींहि औद्योगिक संस्था म्हणजे प्रचंड औद्योगिक साम्राज्यें समजलीं जातात. एरवी हे मोठे दिसणारे कारखाने पण युद्धकाळांत देशाला युद्धसामुग्री भरपूर पुरवण्याचें काम त्यांनींच केलें. ज्याप्रमाणें जर्मनींत क्रुफ् आणि आय्. जी. फॉरवेन् हीं प्रचंड औद्योगिक साम्राज्यें कीं ज्यांच्यांत युद्धसामुग्री निर्मितीची अफाट शक्ति होती. अमेरिकेनें जर्मनींत आल्यावर प्रथम या शक्तीचें विकेंद्रीकरण केलें. त्याप्रमाणें जपानमध्यें आल्यावरहि अमेरिकेनें या तोयोदा व मित्सुबिशी औद्योगिक साम्राज्यांचें विकेंद्रीकरण केलें. जर्मनीतल्याप्रमाणें याची संघटना एवढी जबरदस्त की, थोड्याच अवधींत दोन्हीहि संस्थांनीं आपापला प्रपंच पूर्ववत उभारून जपानी बाजारपेठ व जपानची नाणेबाजारांतली ऐपत पुन्हां प्रस्थापित केली !

**तोयोदा** कंपनीचे मूळ संस्थापक श्री. साकिची तोयोदा यांनीं एक नाविन्यपूर्ण शोध लावला. तो म्हणजे त्यांनीं पहिला स्वयंचलित असा सांचा शोधून काढला कीं ज्याच्यामुळें गिरण्यांच्या रूपरचनेंत क्रांति घडून आली. या शोधाचा उपयोग १९२५ पुढें जपानमध्यें इतका करण्यांत आला कीं, जेव्हां जगांत एक कामगार एका वेळीं २।३ सांचे अन्यत्र चालवत होता, तेव्हां जपानमधला कामगार ३०/३० सांचे चालवून जादा कापड पुरवत होता. जगांतल्या बाजारांत भरमसाट कापड पुरवून त्यानें मंदीची लाट निर्माण केली होती. असें सांगतात कीं, तेव्हां पायमोजे व गंजिफ्रॉक २।३ आण्याला मिळत असत.तोयोदा यांची इच्छा अशी होती कीं आपल्या कंपनीनें फोर्डच्या तत्त्वानुरूप कुणाचीहि नक्कल न करतां स्वतःच्या हिंमतीवर मोटार कारखाना काढावा. त्यासाठी त्यांनीं स्वयंचलित सांच्याचा आपला शोध

जगाच्या बाजारांत विकून पैसा उभारला अन् मोटारकारखान्याची मुहूर्तमेढ रोवली. पण त्यांचें कार्य पूर्ण व्हावयाच्या आंतच ते या जगांतून निघून गेले. यांच्या मुलानें त्यांची ही इच्छा पूर्ण केली आहे.

**कारखान्यांसारख्या** रुक्ष गोष्टीचे विचाराबरोबरच मुलाफुलांचे विचारहि मनांत आल्यावाचून रहात नव्हते. फुलांवर प्रेम करायचें, फुलझाडांची निगा राखायची, व फुलांच्या सहवासानें वातावरणांत जास्तींत जास्त आनंद भरायचा, तो कसा ? हें जपानी लोकांकडून शिकण्यासारखें आहे. जी गोष्ट फुलांची, तीच मुलांचीहि ! फुलें व मुले सर्वांनाच आवडतात पण जपानी लोकांना मुलांचे वेड जरा जास्तच. यांतूनच तिथल्या वाढत्या लोकसंख्येचा उगम झाला असावा. आईवडील मुलांचे अतिशय लाड करतील, मुलांसाठीं अनेक प्रकारचीं खेळणीं दुकानांतून ठेवतील. अगदीं भातुकलीचा खेळ म्हटला तरी सर्व संसारोपयोगी चिजा खेळण्यांतहि विकत मिळतात. भांडीं, फर्निचर, भावल्यांचे तयार शिवलेलें कपडे, दागिने सर्वच प्रकार खेळण्यांत मिळतात. मुलांसाठीं अशी अनेक प्रकारचीं खेळणीं व तीं खेळणीं खेळतांना त्यांतून मुलांना शिक्षणहि मिळतें. खाण्याच्या बाबतींतहि फार लाड चालतात. गोड पदार्थ तर इतक्या प्रमाणांत दिले जातात कीं पहावत नाही! पण इतक्या सुंदर, गुबगुबीत, गोऱ्या मुलांचें दांत मात्र पहावत नाहीत इतके किडके असतात ! मात्र कितीहि लाड केले तरी त्यांना शिस्तीनें वागण्याचें बाळकडू पाजायला पालक विसरत नाहींत. कुठेंहि हिंडून आलं तरी भाषेंतहि फारसा फरक सांपडत नाहीं. साक्षरतेचें प्रमाण सर्वत्र चांगलें असल्यानें अशिक्षितपणाचे दुष्परिणाम सहसा कुठें दिसत नाहींत.

**प्रत्यक्ष** जपानमध्यें वावरत असतांना, किंवा तो देश पहात असतांना भारतांतल्या चांगल्या गोष्टींची वारंवार आठवण होत होती. परततांना हाहि विचार मनांत येत होता की, जपानमधल्या कांहीं गोष्टी आम्ही भारतीयांनी शिकून घेतल्या तर आमच्या चांगल्या गुणांत आणखी

जास्तच भर पडेल. कांहींतरी वेगळं पाहिल्यानंतरच तुलनेनें हे विचार आपल्याला सुचूं शकतात. विविध विचारांत मन गुंतलें होतें, तरी "अयोध्येची राणी" आम्हाला भारताकडे घेऊन चालली होती, आणि मग जसें आम्ही जपानला गेलों तसेच हाँगकाँग, बँकॉक, कलकत्ता आदि वैमानिक स्टेशनें घेत घेत "पुनरागमनायच" या उक्तीनुरूप आम्ही उभयतां नियोजित वेळीं मुंबईच्या तळावर येऊन सुखरूप उतरलों आणि मायभूमीला मनोभावानें प्रणाम करून म्हटलें—

जयहिंद!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
REFBK-0012992

# पाहिलेल्या सुप्रसिद्ध शहरांसंबंधीं

१. **टोकियो**:— जपानची राजधानी (लोकवस्ती ८४७२०००), जगप्रसिद्ध बाजारपेठ, **प्रेक्षणीय स्थळें** :— (१) इंपीरिअल पॅलेस (२) मेजीशाईन उद्यान (३) म्युझिअम (४) आसाकुसा ॲम्यूजमेंट सेंटर (५) काबूकी नृत्यगृह (६) VENO PARK (७) GINZA BAZAAR. (पृष्ठ ७ पहा)

२. **आतामी**:— टोकियोपासून अंतर ६४ मैल. HOT SPRING हें या ठिकाणचें वैशिष्टय, निसर्गशोभा अप्रतिम. (पृष्ठ १८ पहा)

३. **ओसाका**:— टोकियोपासून अंतर ३४४ मैल. (लोकवस्ती २५४७३००) व्यापारी व औद्योगिक शहर. (पृष्ठ १९ पहा)

४. **कयोटो**:— ओसाकापासून अंतर २५ मैल. **प्रेक्षणीय स्थळें** :— (१) श्राईन्स (२) राजवाडे (३) देवळें (४) उद्यानें उदाहरणार्थ गिकाकुंजी, किंकाकुंजी, जुना राजवाडा, निजो कॅसल. (पृष्ठ २३ पहा)

५. **नागोया**:— टोकियोपासून अंतर २२७ मैल. बोटी–ऑटोमोबाईल्स–स्पिनिंग मशीन्स–केमिकल्स आणि पुष्कळशा कारखान्यांनीं हें शहर समृद्ध आहे. प्रेक्षणीय स्थळें (१) नागोया कॅसल (२) आतुस्ता इवाईन (३) गिफू येथील कॉरमॉरंट फिशिंग (४) T. V. TOWER. (पृष्ठ ४६ पहा)

६. **निक्को**:— टोकियोपासून अंतर ९० मैल. निसर्ग सौंदर्य बहारीचें. प्रेक्षणीय स्थळें (१) तोशोगु श्राईन (२) योमेमोज गेट (३) म्युझिअम (४) केनॉग धबधबा (५) CHUZE-NJI LAKE. (पृष्ठ ५० पहा)

---

# श्री. ल. के. तांबे यांचीं पुस्तकें

| (अ) हस्तसामुद्रिक विषय | प्रस्तावना | मूल्य |
|---|---|---|
| १. मनोनिरीक्षणाचें साधन | (प्रा. न. ग. दामले) | १–०० |
| २. हातावरील गुपित | | ०–७५ |
| ३. आत्मसंदेश | (होराभूषण दीक्षित) | १–५० |
| ४. भावचित्रें | (गो. ज. बोरकर) | १–५० |
| ५. करदर्शन | (दा. ना. आपटे) | ३–५० |
| ६. ब्रह्मलिखित | (प्रा. शं. वा. दांडेकर) | ६–०० |

— आगामी —

| | | |
|---|---|---|
| ७. सा क्षा त्का र | ( ? ) | १२–०० |

## (आ) प्रवासवर्णनें व चरित्रें

| | | |
|---|---|---|
| ८. काश्मीर सहल | (राजकवि यशवंत) | १–५० |
| ९. केदार-नारायण यात्रावर्णन | | १–२५ |
| १०. श्री. बोरकर महाराजांचें चरित्र | (केसकर महाराज) | ३–५० |

— आगामी —

| | | |
|---|---|---|
| ११. श्रीसत्येंद्रनाथ स्वामींचें चरित्र | ( ? ) | ? ? |

ब्रह्मलिखित प्रकाशन,

वेस्टर्न इंडिया सदन, टिळक रोड,

पुणें २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रम ........................ वि: ....................

क्रमांक ........................ नों. दि ....................

| | पृष्ठ |
|---|---|
| हाँगकाँग | ७ |
| जपानी नृत्य, डिपार्टमेंट स्टोअर | १० |
| याकोहामा | १७ |
| हॉट स्प्रिंग, नुमाझू | १९ |
| आंतर जागतिक प्रदर्शन | २१ |
| हेन श्राईन | २३ |
| नीजो कॅसल, किन्का कुंजी | २४ |
| ओकुमा मशीनरी वर्क्स | २५, ४२ |
| " खाया " पुरातन वृक्ष | २६ |
| टेलिव्हिजन केंद्र, तोकुगावा म्युझिअम | २७ |
| निकुताईजी मंदिर | २८ |
| भूयारी रस्ता, आकाशवाणी केंद्र | २९ |
| चिनीमाती भांड्यांचा कारखाना | ३० |
| किंडर गार्डन स्कूल | ३३ |
| इमारतीवरील बाग (ROOF GARDEN) | ३४ |
| अिनियामा कॅसल | ३६ |
| मुमतारो गार्डन, कामोझाकी मंदिर | ३७ |
| गिफू | ४० |
| झुआलॉजिकल गार्डन | ४१ |
| केगॉन धबधबा | ५१ |
| YOMEI-MON-GATE | ५६ |
| पॅगोडा | ५६ |